७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०६१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## उसाचे पाचट जळताना शरीर भाजल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

**पुणे (दै. संध्या) :** खुटबाव (पुणे) - पारगाव (ता. दौंड) येथील शेतातील ऊसाचे पाचट जाळताना शरीर भाजल्याने शेतकऱ्याचा दुर्दैवी मत्यू झाला. जालिंदर भालचंद्र भाडळे (वय-६९, राहणार पारगाव, ता. दौंड, जिल्हा पुणे) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. सदर घटना दि. २२ रोजी दुपारी सुमारे २.०० वाजण्याच्या सुमारास घडली. यवत पोलीस ठाण्यामध्ये भाडळे यांचे पुतणे अभिजीत भाडळे (राहणार पारगाव, तालुका दौंड जिल्हा पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. दुपारच्या सुमारास मृत भाडळे हे शेतामध्ये चक्कर येऊन पडले. उसाचा फड पेटता असल्याने त्यांचे शरीर भाजले होते. यामध्ये भाडळे यांच्या हाताला, पायाला, मानेला भाजल्याने गंभीर जखमा झाल्या होत्या. घटना घडल्यानंतर शेजारील शेतामध्ये खुरपणाऱ्या महिला व युवकांच्या संबंधित घटना निदर्शनास आली. त्यानंतर युवकांनी भाडळे यांना बोरीपार्धी येथील निरामय हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉ. विशाल खळदकर यांनी भाडळे यांना मृत जाहीर केले. त्यानंतर यवत पोलीस ठाण्यामध्ये तक्रार देण्यात आली.

# अजितदादा हे महाराष्ट्राला न मिळालेले सर्वोत्तम मुख्यमंत्री

## देवेंद्र फडणवीसांकडून अजितदादांना अनोखी श्रद्धांजली; मुख्यमंत्री भावुक

**मुंबई (दै. संध्या)**



अजित पवारांविषयी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत त्यांचे कौतुक केले. अजितदादा हे महाराष्ट्राला न मिळालेले सर्वोत्तम मुख्यमंत्री होते, असे स्पष्ट विधान त्यांनी केले. क्षमता, निर्णयक्षमता आणि प्रशासनातील पकड यांचा विचार केला तर मुख्यमंत्रीपदासाठी आवश्यक असलेले सर्व गुण दादांमध्ये होते, असे त्यांनी सांगितले. राज्याला एक चांगला मुख्यमंत्री मिळू शकला असता; मात्र ते घडले नाही, ही खंत त्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्रात वसंतदादा आणि अजितदादा ही दोन नावं त्यांच्या कामामुळे कायम स्मरणात राहतील, असेही त्यांनी नमूद केले.

फडणवीस म्हणाले की, दादांची राजकीय कारकीर्द मोठी आणि प्रभावी होती. राजकारणात ते अजून मोठी इनिंग खेळतील, अशी अपेक्षा अनेकांना होती. मात्र जीवनाच्या प्रवासात त्यांनी पहिल्यांदाच टायमिंग चुकवले, असे भावनिक विधान त्यांनी केले. दादांचा वक्तशीरपणा सर्वपरिचित होता, त्यामुळे हे अचानक घडलेले वास्तव अधिक वेदनादायी असल्याचे त्यांनी सांगितले. याची सर्वाधिक हळहळ आपल्याला राहील, असेही ते म्हणाले.

दादांच्या काम करण्याच्या पद्धतीबाबत बोलताना फडणवीस यांनी अनेक आठवणी सांगितल्या. मंत्रालयात कुठल्याही अधिकाऱ्यांपेक्षा आधी पोहोचणारे ते नेते होते. सकाळी नऊ वाजता ते आपल्या दालनात बसलेले असायचे. वेळेचे काटेकोर पालन आणि कामातील शिस्त हे त्यांच्या स्वभावाचे मुख्य गुण होते. एखादा निर्णय त्यांना योग्य वाटला नाही तर ते फाईल थांबवून सविस्तर चर्चा करत. निर्णय घाईत न घेता विचारपूर्वक घेण्याची त्यांची सवय होती, असे त्यांनी स्पष्ट केले.

दादांच्या काही वैयक्तिक सवयींचाही फडणवीस यांनी उल्लेख केला. त्यांना दूध पिण्याची आवड होती. स्वतःबद्दल बोलताना फडणवीस म्हणाले की, मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. मी रोज हळदीचे दूध पितो. दादांच्या साध्या सवयी आणि स्वच्छतेकडे असलेले लक्ष त्यांना विशेष वाटायचे. ते चप्पल वापरत, पण पाय नेहमी स्वच्छ ठेवत, अशी आठवण त्यांनी सांगितली. अशा छोट्या-छोट्या गोष्टींमधून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील शिस्त आणि नीटनेटकेपणा दिसून येत होता.

## जीव नकोसा होईल एवढे आरोप नको : उद्धव ठाकरे

अजित पवारांवर 70 हजार कोटींच्या घोटाळ्याचे आरोप झाले. पण त्यामुळे ते खचले नाही. त्यांच्या जागी दुसरा एखादा व्यक्ती असता तर त्याने खचून जाऊन जीव दिला असता. पण अजित पवारांनी या आरोपांना आपल्या कामातून उत्तर दिले. त्यामुळेच त्यांच्यावर आरोप करणाऱ्यांनीही त्यांचा सहकारी म्हणून स्वीकार केला, असे मत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी विधानपरिषदेत अजित पवारांवरील शोक प्रस्तावावर बोलताना व्यक्त केले. यावेळी त्यांनी राजकारण्यांना जीव नकोसा होईल, एवढे कुणावरही आरोप करू नका, असा सल्लाही दिला.

## स्पष्ट निर्णयक्षमता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य

अजित पवार हे एका पिढीचा आत्मविश्वास होते, असे सांगताना फडणवीस यांनी त्यांच्या कामकाजातील काटेकोरपणाचा विशेष उल्लेख केला. दादांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणारी नाही, असे ते म्हणाले. शेवटची भेटच अखेरची ठरेल, असे कधी वाटले नव्हते, ही खंत त्यांनी व्यक्त केली. दादांकडे कोणतेही काम अपूर्ण राहत नसे; प्रत्येक बाब कागदावर नीट लिहिलेली असायची. नियोजनबद्ध काम आणि स्पष्ट निर्णयक्षमता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते, असे त्यांनी सांगितले.

अजितदादांचे नेतृत्व, कामातील सातत्य आणि प्रशासनातील पकड यामुळे ते वेगळे ठरले, असे फडणवीस यांनी अधोरेखित केले. मुख्यमंत्री होण्याची क्षमता असूनही ती संधी त्यांना मिळाली नाही, ही खंत त्यांनी पुन्हा व्यक्त केली. राज्याच्या राजकारणात त्यांनी निर्माण केलेला ठसा कायम राहील आणि त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्र त्यांना नेहमी लक्षात ठेवेल, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

विधानसभेत अजित पवार यांच्या शोकप्रस्तावावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली. आज दादा आपल्यात नाहीत, ही खंत मनाला चटका लावणारी आहे, असे सांगताना त्यांनी अनेक आठवणींना उजाळा दिला. यंदा दादांनी आपला 12 वा अर्थसंकल्प सादर केला असता आणि पुढील वर्षी 13 वा अर्थसंकल्प मांडून बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या विक्रमाशी बरोबरी केली असती, असे त्यांनी नमूद केले. पुढील काळात सर्वाधिक अर्थसंकल्प मांडणारे अर्थमंत्री म्हणून त्यांचे नाव नोंदले गेले असते; मात्र अचानक त्यांच्या जाण्यामुळे ही परंपरा थांबली, असेही ते म्हणाले. या वेळी अर्थसंकल्प मांडण्याची जबाबदारी स्वतःवर आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

फडणवीस यांनी सांगितले की, अजितदादांसोबत त्यांचे नाते केवळ राजकीय नव्हते, तर ते अधिक वैयक्तिक आणि भावनिक होते. दादा माझ्यापेक्षा 11 वर्षांनी मोठे होते. खऱ्या अर्थाने ते माझे दादाच होते, असे ते म्हणाले. 2014 नंतर दोघांमध्ये अधिक जवळीक निर्माण झाली आणि एका दशकाहून अधिक काळ परस्परांमध्ये मैत्री व सुसंवाद राहिला. दादांचे अस्तित्व सभागृहात ठळकपणे जाणवायचे.

## रोहित पवार यांना अश्रू अनावर

### अजितदादा पवार नावाचा जादूगार सबंध महाराष्ट्राला हसवत हसवत गेला

**मुंबई (दै. संध्या)**




अजित पवारांच्या शोकप्रस्तावावर बोलताना आमदार रोहित पवार यांना आज विधानसभेत अश्रू अनावर झाले. अजितदादा पवार नावाचा जादूगार संबंध महाराष्ट्राला हसवत हसवत गेला. दादांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणातील मिश्कीलपणा गेला. ते नेहमीच मला माझ्या शर्टचे वरचे बटण लावण्यास सांगत. आता 40-50 वर्षांनंतर कधी दादांची वर भेट झाली, तर मी हे बटण त्यांच्यापुढे लावेन. तोपर्यंत हे बटण असेच खुले असेल. यामुळे त्यांची रोज आठवण येईल, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी सुनेत्रा पवार यांना सर्वोतपरी मदत करण्याची ग्वाहीही दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत अजित पवारांचा शोकप्रस्ताव मांडला. त्यावर बोलताना आज अनेक नेते भावूक झाले. यात अजित पवारांचे पुतणे तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांचाही समावेश होता. रोहित यांना अजित पवारांच्या आठवणी सांगताना आज सभागृहाच्या पटलावर अश्रू अनावर झाले. यावेळी त्यांनी अजितदादांच्या अपघातासाठी दोषी असणाऱ्यांना तुरुंगात पाठवल्याशिवाय स्वस्थ बसणार नसल्याचा निर्धारही बोलून दाखवला.

## इतिहास लिहितांना दादांच्या नावाशिवाय पूर्ण होणार नाही : जयंत पाटील

"२८ जानेवारीला झालेल्या त्या दुर्दैवी अपघातात नियतीने अजितदादांसारखा धडाडीचा नेता आपल्यातून हिरावून नेला. महाराष्ट्रात ज्या नेत्यांकडे समाज मोठ्या आशेने बघतो, त्यांनाच हिरावून घेण्याची नियतीची ही कोणती पद्धत आहे? विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे, आर. आर. पाटील आणि आता अजितदादा... राज्याच्या राजकारणाला नक्की कुणाची नजर लागली आहे?" अशा भावना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी विधानसभेच्या सभागृहात व्यक्त केल्या. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकप्रस्ताव मांडण्यात आला होता. यावेळी गेल्या ४० वर्षांपासूनचे सहकारी असलेल्या अजित पवार यांच्या आठवणींना जयंत पाटील यांनी उजाळा दिला. स्व. यशवंतराव चव्हाणांच्या मुशीतून शरद पवार साहेबांचे नेतृत्व सुरू झाले आणि त्यांचे संस्कार घेऊन अजितदादांनी आयुष्यभर काम केले.

## अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६च्या पहिल्या दिवशी

## मुख्यमंत्री - उपमुख्यमंत्री यांनी घेतली सभापती व उपसभापतींची भेट

**मुंबई (दै. संध्या)**



महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ च्या पहिल्या दिवशी (सोमवार, २३ फेब्रुवारी)मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. या भेटीत अधिवेशनाच्या पहिल्या दिवसाच्या कामकाजाबाबत आणि राज्याच्या विकासाबाबत संक्षिप्त चर्चा झाली. यावेळी संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील हेही उपस्थित होते.

त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची भेट घेतली. या भेटीत अधिवेशनाच्या यशस्वी कामकाजाबाबत चर्चा झाली.

हे अधिवेशन २३ फेब्रुवारी ते २५ मार्च २०२६ या कालावधीत चालणार असून, राज्याचा अर्थसंकल्प ६ मार्च रोजी सादर होणार आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यपालांचे अभिभाषण, शोकप्रस्ताव (अजित पवार यांच्या निधनाबाबत) आणि इतर प्रारंभिक कामकाज पार पडले.

## अजितदादांच्या आठवणींनी विधानभवन भारावले

## सभागृहात एकनाथ शिंदेंचा भावनिक हुंदका



**मुंबई (दै. संध्या) :** राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी वातावरण अत्यंत गंभीर आणि भावूक झाले. दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोकप्रस्ताव मांडण्यात आला आणि त्यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. दादा म्हणजे स्पष्टवक्तेपणा आणि वक्तशीरपणाचं प्रतीक होतं, असे सांगताना शिंदे यांचा आवाज दाटून आला. दादा, तुमचा हा निर्णय चुकलेला आहे, माघारी या, असे शब्द उच्चारत त्यांनी सभागृहातील प्रत्येक सदस्याला भावूक केले. आज सभागृहात नजर टाकली की ते डोळ्यासमोर उभे राहतात, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. अधिवेशनाचा पहिला दिवस असताना गेली 22-23 वर्षे एकत्र काम केलेल्या सहकाऱ्याबद्दल अशा प्रकारे बोलण्याची वेळ येणे हे अत्यंत वेदनादायी असल्याचे शिंदे म्हणाले. अजित पवारांसारखा नेता गमावणे ही राज्यासाठी मोठी हानी आहे, असे त्यांनी नमूद केले. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही, असे सांगत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. कालची पत्रकार परिषद असो, शिवजयंतीचा कार्यक्रम असो किंवा आजचे सभागृह, प्रत्येक ठिकाणी त्यांची उणीव प्रकर्षाने जाणवत आहे, असे ते म्हणाले. ज्या दिवशी अजित पवारांचे निधन झाले, त्या दिवशी प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू होते, असे सांगताना शिंदे भावूक झाले. लाख गेले तरी चालतील, पण लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे, असे म्हणत त्यांनी नियतीपुढे माणूस हतबल ठरतो, याची जाणीव करून दिली. लाखो अनुयायांना पोरके करून ते गेले, असे त्यांनी सांगितले. या घटनेने पवार कुटुंबावर मोठा आघात झाला आहे, असे नमूद करताना त्यांनी स्वतःच्या आयुष्यातील दुःखद प्रसंगांची आठवण करून दिली. अपघातात दोन मुलांचे निधन आणि गुरु आनंद दिघे यांचे जाणे या वैयक्तिक वेदना त्यांनी सभागृहासमोर मांडल्या. देवेंद्रजी आणि मी मित्र गमावला आहे, असे सांगत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही उल्लेख केला. अजित पवारांच्या कामकाजाची शैली वेगळी आणि प्रभावी होती, असे शिंदे यांनी सांगितले. ते अत्यंत अभ्यासू होते आणि प्रशासनावर त्यांची पकड भक्कम होती. त्यांनी फाईल हातात घेतली की त्यातील त्रुटी लगेच लक्षात आणून द्यायचे. बैठकीत एखादा कागदाचा तुकडा पडला तरी ते त्यांना चालत नसे. कामातील शिस्त आणि काटेकोरपणा हे त्यांच्या स्वभावाचे भाग होते. ते कधीही नकारात्मक बोलत नसत. कोरोना काळातही ते मंत्रालयात जाऊन काम करत होते. अधिवेशन काळात ते पूर्णवेळ उपस्थित राहून विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर देत असत. कामात तडजोड न करणे हा त्यांचा स्वभाव होता, असेही शिंदे म्हणाले.

सरकार स्थापनेच्या चर्चादरम्यान घडलेली एक आठवणही शिंदे यांनी सांगितली. पत्रकार परिषद सुरू असताना अजितदादांनी त्यांच्या हातातून माईक घेतला आणि एकनाथरावांचं माहिती नाही, पण मी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहे. लाडकी बहीण योजना राबवायची आहे, असे जाहीर केले. त्या योजनेवर तिघांचे एकमत झाले होते आणि राज्याचा आर्थिक गाडा योग्य मार्गावर ठेवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, असे शिंदे म्हणाले. त्यांच्या दीर्घ अनुभवाचा सरकारला मोठा फायदा झाला.




# संपादकीय

## कांकण

दव भिजल्या पहाटेस, धरा लक्ष्मीसम खुलली. पूर्वा चैतन्य फुलवीत कणाकणांत मोहरली। कांकण भरल्या हातांना, वर्ख चढला सोनरूपी. हिर्वा पदर शालूचा मृदगंध अत्तरकुपी। मोरपीस पूजा काळे

व्हय आज अत्तरकुपीतलं सुगंधित अत्तर लावून हातभर कांकण भरण्याचा मोह व्हतोय. सूर्य डोईशी येतूपावस्तर जिमिनिच्या हौसेला मागं टाकलयं म्या. माझ्या भितूर आतमंदी दडलेल्या मनमंदिराला उगा नटण्याची उमेद जागी झालीय. अवं आता कशाला म्हणून काय ईचारता? त्याचं असं झालं बघा, दोन-चार दिसापूर्वी म्या मुंबैक पावले व्हते. तिथं माझी मैतर नंदि भेटली. ही नंदि म्हंजै आताशा झालेली प्रधानाची सून बाय व्हय. हायस्कूलातली मैतर. मुंबैत एका लगीन कार्यक्रमात आमी एकमेकींना बेस झाकपाक भेटलो अन् काय तर पुढं जाऊन बालपनीच्या गप्पांत रमलो अन् हापसून गोष्टी करता हामसून हामसून रडलो बी. त्यायेळी संसाराला कामाची ठिगळं जोडत नाव कमवलेली माजी मैतर नंदिनी मला लय लय मोठी भासली. प्लास्टिक, मेटल अन् काय बाय तो काच बांगड्यांचा धंदा म्हणजे व्यवसाय की काय म्हनतात ना.! हा हा तोच तो क्षीत्रिशा नाव असलेला भलामोठा रंगीत बांगड्यांचा बिजनेस हाय तीचा. धंद्याच्या शिरपेचात आणखी काम वाढवून नाव बी झालंया बघा तीचं. पावलं लय जोमात पडत हायैत तीची. त्याचा आनंद बी लैच हाय मला. पन बया तिच्याकडच्या रंगीत काच बांगड्यांनी मी लय सुखावलेय बघा. माझं डोळं साप दीपलंया. माह्या संग्ती आल्येल्या सुदिक आनंदी पावल्यात बगा. आता बांगड्या म्हंटल की बाईचा जीव की प्राण हो! बाकि काय बी नसलं तरी, गळ्यात काळं डोरलं अन् हाती काच बांगडी हिचं बाईची पहिली वळख नव्हं. मंग कांकण पावून माझा बी जीव निस्ता पागळला. पार कामाचा, संसाराचा पसारा उपसता दिस मावळया लागल्यार कांकण किणकिण कानात नुस्ती रूंजी घालू लागली. या बया या नंदिच बी कौतिक करायाचं हवं. सण, उत्सव म्हणूनशान नका. लग्न, मुंज, हल्दी पसारा म्हनू नका, तीचा छोटा हत्ती ट्रक दीनरात आपल्या शेवेसाठी तयार बघा. पावन तो कांकण भरलेला छोटा हत्ती ट्रक पाहून म्या भलतीचं खूश झाले बया. बाबो किती किती प्रकारच्या बांगड्या व्हत्या त्यात. म्ह्या कांकणाच्या प्रेमातचं पडले ना राव! जादू झाल्ती, मग काय ईचारता? घरला आलत्यार उसकला बोजाबिस्तारा अन् राप राप रापला घरभर पसरलेला कांकण संसार. गवसतील तशी लाल, हिर्वी, पिवली कांकण हातात भरत गेले. आ SSS वासून डोळं फोडून ही चुटूक कांकण मास्न्ही पाहत व्हती. आता आमी बी खूश अन् आमचं गडी बी लय खुश झालं व्हतं. मंग काय ईचारता काय बाय लिवून सोडलं न्हव्ह आमच्यावर आमच्या सरकारनं, आमच्या रावानं... गोड हास्याची खळी तुझ्या ग् गाली, नथ शोभे कुरळ्या कुंतली. नजर बाणानं ग् घायाळ करी तू जीवा, हाती कांकण चुडा जैशी नववधू आली. ते ऐकून आईच्यानं माझं अंग-अंग शहारलं. म्याही सुखावले, धनी प्रेमापुढं लाजून गोरी म्होरी झाले. पुढं धनी म्हणतो कसा... सखू मोकळं ठेवू नको हात शोभत नाही ग् तुला. तुझ्या ग् राणी सोनेरी कंकणात हाय सधनता, ऐश्वर्य जे खुलवतं तुजं सौंदर्य. तू शोभते जणू परी, काचच्या कांकणात रावाची मालकीण खरी. तोडे, गोठ, पाटल्यांना हरवतील ग् तुझ्या हातच्या काच बांगड्या. जैशी हिर्व्या काकणात तू नारी ग् सुंदरी. साजणी तू ग् माझी पाटलीणं भारी. कारभारणी माह्या प्रेम प्रतीक असलेल्या कंकणानं भरलाय तुझा माझा संसार...


व्हय मला बी आटवतयं... घरला पहिली वैली पोर जन्मा आली तशी, घर भरून कांकण नाचले व्हते. फिरले व्हते कौतुक. किणकिण स्वरसूर तालानी सुखावले व्हते माझं मायबाप. मला वाटतयं कंकणामध्ये बायांचे वैभव दडलय म्हणून. या बायांचं अडलं नडलं गुपित बोलतात ही कंकण. किणकिण काकण साद घाली यौवनाला. प्रित उमलताना आपल्या अदानी पाषाण हृदय घायाळ करतात या ललना. मेहंदी भरल्या हातात कंकण खुळखुळतात. पायी घुंगर रुणझुणतात. पैठणी सजते नाचऱ्या मोरात. रायाला खुणावते चांदणी. राया, बघा ना बोलाविते देखणी. लेकी, मुली सासरी जाताना हिचं कांकण मग गपगुमान राहतात. मनाच्या नाजूक धाग्यात गुंफलेला असतो बंध रेशमाचा. मायचा गर्भ जोडला जातो नाळनं. नऊ महिनं ज्या माऊलीनं आपलं पोषण केल तीचं ऋणी राह्तो आयुष्यभर आपन. जवा नात्यात गुंफण व्हते रक्षाबंधन दिवशी तवा कांकण जोडत तन-मन-धन. आन् एक दिस साताजन्माच्या गाठीत डोरल्याच्या मणीत घट्ट रूजतं आपलं जिनं शेवटल्या श्वासापर्यंत.

## संस्कृत सुभाषित

अद्रोहं सर्वभूतेषु कर्मणा मनसा गिरा
अनुग्रहश्च दानं च शीलमेतत्प्रशस्यते ॥
(शांतीपर्व, अध्याय १२४, ६६, महाभारत)

अर्थ :कृतीने, मनाने आणि वाणीने कोणत्याही प्राण्यास त्रास न देणे, परोपकार करणे, दान करणे या प्रकाराचे शील प्रशस्त होय.

## गुरु वचन



### अशुभ झाले शुभ : आचार्य शिवेंद्र नागर

सद्पुरुषचे लक्षण काय? संसारासासाठी निरर्थक असलेल्या वस्तुंनी तो व्यक्ती संतुष्ट आहे. गल्लीतल्या कपड्याच्या तुकड्याने ज्याने शाल बनवली आहे, त्याचे मन, पाप–पुण्यापेक्षा मोठे आहे. असा योगी कधी बालकाप्रमाणे खेळतो तर कधी वेडा होतो. त्यास खेळताना पाहून तो वेडा झाला असे समजू नका. वेड्यासारखे समजा, बालकाप्रमाणे माना. त्याच्या शरीराला कमीत कमी वस्तूंची गरज आहे व त्यावर संतुष्ट आहे. आपण जितक्या जास्त वस्तूंवर अवलंबून आहोत, तितके जास्त दु:खी आहोत.

५० वर्षापूर्वी स्वयंपाक घर आजच्या इतकी संपन्न नव्हते. आज आपल्याकडे मिक्सर, गिझर, कुलर, कुकर, मायक्रोवेव्ह अवन आहे. वेळ सुद्धा आहे पण त्या वेळेची तरतूद कुठे होत आहे. जितके जास्त आपण वस्तुंवर अवलंबून राहू, तितके आपले दु:ख वाढते. जर अमेरिकेत कोक बंद झाले तर लोक तो धक्का कसे सहन करतील. जर भारतात चहावर बंदी लावण्यात आली तर काय होईल!

शब्द –विषय अर्थात् यरू विश इति। जे विष आहे, ते नियंत्रित केले पाहिजे. तुम्ही एखादे औषध घेता तेव्हा त्यावर लिहिले असते की 'पॉयझन' म्हणजे काय? जर याचा दुरुपयोग केला म्हणजे जास्त मात्रात घेतले तर तुम्ही दगावू शकतात. ज्या माणसाच्या गरजा कमी आहेत, ज्याचे शरीर योगात आहे, तो यामुळे जास्त प्रभावित होणार नाही. तो पाप–पुण्य, शुभ–अशुभ विचारातून मुक्त आहे. आपल्या डोक्यात शुभ–अशुभ फिट झाले आहे. दक्षिण भारतात डोक्यावर पदर घेणे अशुभ मानले जाते, उत्तर भारतात डोक्यावर पदर घेणे शुभ मानले जाते. पंजाबमध्ये उडीद दाळ शुभ प्रसंगी खाल्ली जाते व उत्तर प्रदेशात उडीद दाळ मृत्यू प्रसंगी खाल्ली जाते. उडीद दाळ एका ठिकाणी शुभ तर इतर ठिकाणी अशुभ आहे. एका ठिकाणी डोक्यावर पदर घेणे शुभ आहे तर दुसऱ्या ठिकाणी अशुभ.

५० वर्षापूर्वी मुलींचे नोकरी करणे अशुभ होते, ते आज शुभ झाले. विदुर नीतित दूध विकणे आई विकण्यासारखे आहे. काळ बदलला. दुध विकणे वाईट पण विना नफा–तोटा तत्वावर विकणे योग्य आहे. काळ आणखी बदलला. दूध विकणे योग्य आहे त्यात थोडा नफा झाला तर चालते पण कमीत कमी पाणी टाकून विकावे. आज तर दुध विकणे, नफा कमावणे, पाणी टाकणे सुद्धा योग्य पण स्वच्छ पाणी टाकून तरी विका.

काही काळापूर्वी जी गोष्ट शुभ होती ती आज अशुभ होऊ शकते. काही काळापूर्वी जे अशुभ होते ते आज शुभ असू शकते. पाप–पुण्याच्या फेऱ्यातून संत वर आले आहेत. गीतेत वारंवार येते की, दोन्ही सैन्यांमध्ये कौरव नकारात्मक, पांडव सकारात्मक दिसतात. ज्ञानी चांगल्या–वाईटातून वर येतो. असा माणूस संसारात बालकाप्रमाणे आहे.

मुलांना येणाऱ्या काळाची चिंता किंवा गतकाळाचे दु:ख नाही. ज्ञानी व्यक्ती मुलाप्रमाणे आहे. मुलं नेहमी वर्तमानात राहतात. शंकराचार्य म्हणतात की, ज्ञानी व्यक्ती वेड्याप्रमाणे असतो. तो ज्या पातळीवर आहे, ते आपणास समजू शकत नाही. त्याच्यासाठी कुणी आपले किंवा त्रयस्त नाही. ज्या शरीराच्या गरजा कमी आहेत, जे पाप–पुण्यापेक्षा वर आहेत, ते लोक वेड्याप्रमाणे आहेत, ते बालकाप्रमाणे आहेत.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:कृत्तिका १५:०६:५७ |
| २४ फेब्रुवारी २०२५ | योग:ऐन्द्र ०७:२३:१८ |
| मंगळवार | योग:वैधृति २८:२५:४७+ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि १७:५७:२२ |
| फाल्गुन शके | करण:बव २८:५१:५४+ |
| संवत्– १९४७ | सूर्य:कुम्भ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | चन्द्र:वृषभ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– फाल्गुन | मुस्लिम मास – रमजान |
| ऋतु– सौर शिशिर | तारीख – ६ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:अष्टमी | दुर्गाष्टमी |
| २८:५१:५४+ | जागतिक मुद्रण दिन |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८६९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 7 | 2 | | 3 | 5 | | 1 |
| | 6 | 9 | 7 | | | 8 | | |
| | 3 | 5 | | 4 | | | 9 | |
| 4 | | | | | 7 | | | 9 |
| | | 8 | | | | 4 | | |
| 3 | | | 9 | | | | | 6 |
| | 9 | | | 2 | | 3 | 5 | |
| | | 3 | | | 9 | 6 | 1 | |
| 5 | | 1 | 3 | | 6 | 9 | | 4 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८६८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7 | 3 | 4 | 8 | 2 | 6 | 5 | 9 |
| 4 | 2 | 8 | 5 | 9 | 6 | 3 | 7 | 1 |
| 9 | 6 | 5 | 1 | 3 | 7 | 4 | 2 | 8 |
| 8 | 4 | 6 | 9 | 2 | 3 | 5 | 1 | 7 |
| 7 | 5 | 1 | 6 | 4 | 8 | 2 | 9 | 3 |
| 3 | 9 | 2 | 7 | 5 | 1 | 8 | 4 | 6 |
| 5 | 1 | 4 | 8 | 6 | 9 | 7 | 3 | 2 |
| 6 | 3 | 9 | 2 | 7 | 5 | 1 | 8 | 4 |
| 2 | 8 | 7 | 3 | 1 | 4 | 9 | 6 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५८२ – पोप ग्रेगोरी तेराव्याने ग्रेगरी दिनदर्शिका प्रदर्शित केली.
- १७३९ – कर्नालची लढाई – नादीरशहाचा मुघल सैन्यावर विजय.
- १८२६ – यांदाबूचा तह – म्यानमार व इंग्लिश सैन्यातील लढाई थांबली.
- १८३१ – डान्सिंग रॅबिट क्रीकचा करार – अमेरिकेतील चॉक्टाओ जमातीने मिसिसिपी नदीच्या पूर्वेकडील भाग अमेरिकेला दिला.
- १८४५ – फ्रांसचा राजा लुई–फिलिपने पदत्याग केला.

### राष्ट्रीय

- १९२४ – महात्मा गांधी कारागृहातून सुटले.
- २००७ – झारखंडचे मुख्यमंत्री मधु कोडा देशातले पहिले अपक्ष मुख्यमंत्री बनल्यामुळे यांचे नाव लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंदवण्यात आले.

### जन्म

- ११०३ – टोबा, जपानी सम्राट यांचा जन्म.
- १३०४ : इब्न बतुता, मोरोक्कोचा शोधक याचा जन्म
- १५०० – चार्ल्स पाचवा, पवित्र रोमन सम्राट यांचा जन्म.
- १५५७ – मथियास, पवित्र रोमन सम्राट यांचा जन्म.
- १८८५ : चेस्टर निमित्झ, अमेरिकन दर्यासारंग यांचा जन्म.
- १९३४ – बेट्टिनो क्रॅक्सी, इटलीचे पंतप्रधान यांचा जन्म.
- १९४२ : जोसेफ लीबरमन, अमेरिकन राजकारणी यांचा जन्म.

### निधन

- ६१६ : एथेलबर्ट राजा निधन.
- १७७७ – जोसेफ पहिला, पोर्तुगालचे राजा यांचे निधन.
- १७७९ – पॉल डॅनियल लाँगोलियस, जर्मन

## : SMS :

@ Alcohal chalisa' @
Gurur "RAM" ma
Gurur 'WHISKY'
Gurur 'VODKA'
'JIN'eshwara
Gurur 'SCOTCH'a
Pram'BRANDI'
Tasmai shri
'BEER'ey Namah :

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९.८ | २२.३ |
| अहमदनगर | २९.५ | २१.८ |
| अकोला | ३३.६ | २३.१ |
| अमरावती | ३२ | २२ |
| बीड | ३४ | २३.५ |
| भंडारा | ३३ | १९.६ |
| बुलढाणा | २६.८ | १२.५ |
| चंद्रपूर | ३४.१ | २३.३ |
| चेन्नई | ३५.१ | २३ |
| नवी दिल्ली | २७.२ | १५.४ |
| धुळे | ३२ | २२.५ |
| गोंदिया | ३१.१ | १८.९ |
| जळगाव | ३३ | २२.६ |
| कोल्हापूर | ३१.७ | २३.१ |
| लातूर | ३१ | २३.९ |
| मुंबई | ३५.२ | २४.७ |
| नागपूर | ३१.९ | १९.५ |
| नांदेड | ३३.५ | २४ |
| नंदूरबार | २९.९ | २१.३ |
| नाशिक | ३०.५ | २०.३ |
| पुणे | २९.७ | २१.४ |
| पंढरपूर | ३१.७ | २५.१ |
| सातारा | ३१.४ | २१.५ |
| सांगली | ३२.३ | २४.१ |
| सोलापूर | ३२.२ | २४.८ |
| वर्धा | ३३ | २२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम कामात झालेल्या बदलामुळे कष्ट होण्याची शक्यता. व्यापार मध्यम राहील.

**वृषभ :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण आत्मविश्वास वाढीस लागेल. कामात तसेच व्यवसायात मनासारखे यश मिळेल.

**मिथुन :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व मतभेद, वादांना टाळण्याचा प्रयत्न करा. आर्थिक स्थिती चिंताजनक राहिल.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व मुलांकडून थोडा त्रास होईल, परंतू प्रयत्न केल्यास समस्या सुटू शकते.

**सिंह :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम स्वत:च्या विवेकाने निर्णय घेऊन कामे केल्यास यश मिळू शकेल.

**कन्या :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पश्चिम पूर्वी केलेल्या चांगल्या कामाचे फळ आता मिळेल. जोडीदाराशी संबंधात प्रगाढता येईल.

**तुळ :** शुभ रंग–पिवळा, शुभ दिशा–पश्चिम व्यापारिक जबाबदारी, देणे–घेणे सीमित ठेवा.

**वृश्चिक :** शुभ रंग–पांढरा,शुभ दिशा–पश्चिम आपल्या पराक्रमीवृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील.


**धनु :** शुभ रंग–पांढरा, शुभ दिशा–उत्तर कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**मकर :** शुभ रंग–लाल, शुभ दिशा–पूर्व आपले प्रयत्न यशस्वी होतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचार पूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल.

**कुंभ :** शुभ रंग–गुलाबी, शुभ दिशा–पुर्व सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा. विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळेल. विलासी प्रवृत्ती वाढेल.

**मीन :** शुभ रंग–लाल, शुभ दिशा–पुर्व मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८६९



### आडवे शब्द

१. कुप्रसिद्ध
३. अमर करणारे पेय
६. कृती, अंमलबजावणी
१०. अभिप्राय
११. शिळाच्या विरुद्ध
१२. सैनिकांचा जयजयकार
१३. भीती
१४. तंबूची कापडी भिंत
१६. जाणे
१७. वांतीपूर्वीची स्थिती
१९. सोने
२२. चेला
२४. करपलेला भाग
२५. लक्ष्मीचे एक नाव
२६. हुबेहूब सोंग वठवणारा
२८. आत्या
३०. करंजी
३२. पात्याची तीक्ष्णता
३३. मिंधा
३५. घट्ट, रसाने भरलेले
३९. लोणी
४१. मडके
४३. माणूस
४४. निर्माता
४६. नमस्कार
४८. पत्र
५१. स्वकर्तृत्वावर भरवसा ठेवायला सांगणारी म्हण 'अपना हाथ ----!'
५२. शूर
५३. मेहरबानी
५४. खंड न पडता
५६. जन्म–मृत्यू यामधील कालपट
५८. रात्र
५९. शोध, माग
६०. निवासस्थान
६१. दूर करणारा
६२. हात
६४. जीभ
६६. तलाव, विहीर इ.
६८. जाहिरातवजा कागद
७१. संन्याशांचे वसतीस्थान
७३. अग्नी
७४. अहंकार
७५. मार्ग
७६. मित्र
७८. आंब्याची बी
७९. हक्कदार
८०. पुन्हा,८१. धुंदी
८२. तुरुंग, ८३. सावली
८४. मीठ, लवण

### उभे शब्द

१. ताज्या दमाचे मनुष्यबळ
२. सुप्रसिद्ध
३. गबाळ
४. सूर्य
५. नवरा
६. अंजनाचा एक प्रकार
७. जाडसर पीठ
८. उणीव पीठ
९. चरण
१३. आगामी काळ
१५. आस्था, प्रेम
१८. प्राणंतिक वेदना
१९. कलावंत
२०. किंचित कडू
२१. द्रव्य
२२. पाषण
२३. संतोष, आनंद
२५. कमळाचे तळे
२७. दगड, लाकूड याचा पापुद्रा
२९. वरपांगी, दिखाऊ
३१. -- लुचपत, अवैध द्रव्य
३४. गवत
३६. प्रफुल्लित
३७. मसाल्यातील पत्र
३८. आजूबाजूला
४०. घाणेरडे, हीन काम
४२. इच्छा (हिंदी)
४५. काळजी घेणारा
४६. पर्वत
४७. नाकावरील मोत्याचा दागिना
४९. झाडाभोवतीचा कट्टा
५०. असामान्य
५१. आई–वडील
५३. दया करण्याजोगा
५५. अंधार
५७. आशीर्वाद
५८. योग्य, उचित
६२. दुलर्क्ष, हेळसांड
६३. माजलेला
६५. प्रसिद्ध
६७. रक्ताचा रंग
६९. झटकन
७०. चित्रपटाची गोष्ट
७२. चोर, लबाड
७६. पावसाची झड
७७. संस्थाप्रमुख (इंग्रजी)
७८. न वापरलेला
७९. भ्रम, मिथ्या जग

### जम्बो शब्दकोडे क्र. ८६८ चे उत्तर

आडवे उत्तर : १.अल्पोपहार ४.मजल ७.चपखल ११.हार १२.गवर १३.बासरी १४.शतकवीरा १७.बदबदा १९.गारूड २१.कूळ २२.रखवाली २४.कवण २५.नत २६.रामराम २७.झूलकरी २९.अनुत्तीर्ण ३१.तरण ३२.पाक ३३.नीटस ३५.मावशी ३७.घोळ ३८.राजमाता ३९.कृष्णावतार ४२.समोर ४४.तगाई ४५.रमेश ४७.मीन ४९.क्षमा ५०.तटस्थ ५२.वावर ५३.रम ५६.जनकल्याण ५७.महाशय ५९.दरदाम ६१.रती ६२.नरक ६३.टिकटिक ६५.होळी ६६.बेरंग ६८.म्यान ७०.मन ७२.तुलसीदास ७४.नगरी ७६.भरण ७७.नवल ७९.दमदार ८०.कातीव ८१.ढाल तलवार

उभे उत्तर : १.अपशकुन २.पलक ३.रखरख ४.महाबली ५.जरड ७.चव ८.परगाव ९.लबाड १०.बारीकसारीक १५.तळतळाट १६.वीरगती १८.बदाम २०.रूणझुण २३.वामनावतार २४.कमतरता २६.रास २८.कपाळमोक्ष ३०.पाशी ३२.नित्यातला ३४.सराईत ३५.मामा ३६.तृष्ण ३७.घोस ३९.कृश ४०.वणवण ४१.रमी ४३. रमानायक ४६.मेहनत ४८.नरम ५१.टकमक ५२.वाल्या कोळी ५४.तहान ५५.दीर ५६.जरक ५८.शरमिंदा ५९.दरम्यान ६०.दाट ६१अ.परंतु ६५.होन ६७.गलबत ६९.नगद ७०.मणका ७१.घाव ७३.समीर ७५.दम ७७.नव ७८.लढा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शिक्षणाचा वारसा जपत माजी विद्यार्थ्यांची आजी विद्यार्थ्यांना शैक्षणिक भेट

■ कर्मवीर भाऊसाहेब हिरे हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा आनंद मेळा उत्साहात

पुणे (दैनिक संध्या) : शाळेच्या आठवणींनी ओथंबलेले क्षण, मैत्रीचा जिव्हाळा आणि कृतज्ञतेची भावना घेऊन कर्मवीर भाऊसाहेब हिरे हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या शाळेच्या अंगणात पाऊल ठेवत आनंद मेळ्याचे आयोजन केले. शिक्षणाचा वारसा पुढे नेत माजी विद्यार्थ्यांनी आजी विद्यार्थ्यांना वही, पेन, पेन्सिल व विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्याकरिता दिंडी काढली. यासोबतच शाळेच्या विकासासाठी १ लाख रुपयांची देणगी देत संस्थेबद्दलची आपली कृतज्ञता व्यक्त केली. अखिल भारतीय मराठी शिक्षण परिषदेच्या पर्वती येथील शाळेत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमासाठी प्रमिला ताई गायकवाड, अजय आबा पाटील, मुख्याध्यापक माने सर व माजी मुख्याध्यापक संजय भैलुमे सर यांनी मार्गदर्शन केले. तसेच बहुजन मुलांसाठी शिक्षणाची दारे खुली करणारे कर्मवीर भाऊसाहेब हिरे आणि उत्तमराव पाटील यांना रांगोळीच्या माध्यमातून चलचित्र साकारून अनोखी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. हा संपूर्ण उपक्रम हिरे हायस्कूल माजी विद्यार्थी संघ यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला. शाळेच्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. वर्गातील तासांत शिक्षकांशी गप्पा मारत जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. मधल्या सुट्टीनंतर मैदानावर कबड्डी, खो-खो, लंगडी अशा खेळांनी वातावरणात उत्साहाची भर पडली आणि माजी विद्यार्थ्यांनी आपल्या सुवर्णकाळाचा पुन्हा एकदा अनुभव घेतला. शिक्षणाबद्दलची निष्ठा, शिक्षकांविषयी आदर आणि समाजाप्रती बांधिलकी यांचे सुंदर दर्शन या आनंद मेळ्यातून घडले.

### कोल्हापुरातील फेमस रॅपर 'ए किंग'चं 'वाघ आला' हे हटके रॅप साँग प्रदर्शित



पुणे (दैनिक संध्या) : मराठी संगीतविश्वात आजकाल वेगवेगळ्या धाटणीची गाणी प्रदर्शित होत आहेत. त्यामुळे मराठी संगीताचा प्रभाव महाराष्ट्रभर वाढत चालला आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील यंग रॅपर 'ए किंग'च नुकतचं "वाघ आला" हे रॅप गाण प्रदर्शित झाल आहे. तर विशेष म्हणजे या गाण्याचं संपूर्ण चित्रीकरण कोल्हापुरातील ग्रामीण भागात झालं आहे. या गाण्याचे दिग्दर्शन ए किंग आणि विकास पवार यांनी केले आहे. या गाण्यात रॅपर ए किंग सोबत अनिता गनमाळे, मित्तल पांड्या, करण बोरे, सूरज कांबळे, सौरभ या कलाकारांनी काम केले आहे. या गाण्याची गीतरचना ए किंगने केली असून या गाण्याचे संगीत प्रवीण एवाळे यांनी केले आहे. राकेश कांबळे आणि विवेक साठे हे डीओपी आहेत. प्रोजेक्ट हेड योगेश आणि विरेन आर टू हे आहेत. रॅपर ए किंग या गाण्याच्या प्रोसेसविषयी सांगतो, "मला संगीताची लहानपणापासूनच आवड होती म्हणून मी संगीत क्षेत्रात आलो. रॅप, हिप हॉप हे संगीत मी क्रांतीचं प्रतीक मानतो. जेणेकरून ज्या आर्टिस्टला आपल्या लिखाणातून एखादा संदेश द्यायचा आहे. किंवा प्रबोधन करण्यासाठी रॅप संगीताचा उपयोग होतो. मला मोटिवेशनल, एनर्जेटिक आणि मनोरंजन करणार एक गाण बनवायचं होत. तर मला वाघ आला या शब्दांमधून गाण सुचत गेल. आणि मी ते रॅप फॉर्म मध्ये करायचं ठरवलं. रेकॉर्डिंगच्या वेळेस मी जवळपास तीनदा रिटेक दिले कारण हे एकदम हाय पिचवर गाणं आहे." पुढे तो गाण्याच्या चित्रीकरणाविषयी सांगतो,"कोल्हापुरातील शिरोली एम आय डी सीतील इंदिरानगर परिसरात या गाण्याचं चित्रीकरण झालं. या गाण्याच्या शूटींगचा किस्सा म्हणजे गावातले एक आजोबा अचानक सेटच्या इथे आले आणि म्हणाले मला घ्या गाण्यात तुमच गाण फेमस होईल. त्यांच्यासोबत गाण्याचं शूट केलं. आम्हाला गाण शूट करताना फार धम्माल आली. मी आशा करतो की तुम्हाला हे गाणं नक्की आवडेलं."

### जाने अनजाने हम मिले'मध्ये हाय व्होल्टेज ट्विस्ट; जयती भाटिया नव्या रहस्यमय भूमिकेत!



पुणे (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका जाने अनजाने हम मिले सध्या कथानकातील नव्या वळणांमुळे चर्चेत आहे. भरत अहलावत (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेत आता जबरदस्त नाट्य रंगणार असून अनुभवी अभिनेत्री जयती भाटिया दमदार पुनरागमन करत आहेत. यापूर्वी शारदा या भूमिकेतून प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या जयती भाटिया यांना प्रेम आणि द्वेष दोन्ही मिळाले होते. मात्र यावेळी त्या पूर्णपणे वेगळ्या आणि रहस्यमय अवतारात दिसणार आहेत. त्या 'शालिनी बत्रा' ही नवी व्यक्तिरेखा साकारणार असून तिच्या आगमनाने कथानकात नवा ट्विस्ट येणार आहे. शालिनीच्या व्यक्तिरेखेबाबत सध्या प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. आपल्या नव्या भूमिकेबद्दल बोलताना जयती भाटिया म्हणाल्या, "शालिनी बत्रा ही व्यक्तिरेखा अजून विकसित होत आहे. ती सकारात्मक असेल की नकारात्मक, हे अद्याप स्पष्ट नाही. कथा जसजशी पुढे जाईल तसतसा तिचा प्रवास उलगडत जाईल. एवढे मात्र निश्चित की ती लंडनहून परतली आहे आणि एक सेवाभावी संस्था तसेच आश्रम चालवते, जिथे ती गरजू मुलांची काळजी घेते. तिच्या भूतकाळात काहीतरी दडलेले आहे. शारदा आणि शालिनी एकच व्यक्ती आहे की नाही, हे पाहणे प्रेक्षकांसाठी खूपच रोचक ठरेल." काही आठवड्यांच्या ब्रेकनंतर सेटवर परतण्याचा अनुभवही त्यांच्यासाठी खास ठरला. त्या म्हणाल्या, "मला संपूर्ण टीमची खूप आठवण येत होती. सगळे माझ्याशी सतत संपर्कात होते आणि मी कधी परतणार याची विचारणा करत होते. जेव्हा मी भरतला सांगितले की मी पुन्हा शूटिंग सुरू करणार आहे, तेव्हा तो आनंदाने म्हणाला, 'माझी काकू परत आली!' माझ्या पात्राचा पुढचा प्रवास काय असेल याबद्दल मलाही प्रचंड उत्सुकता आहे." आता शालिनीचा रहस्यमय प्रवेश रीत आणि राघवच्या आयुष्यात शांतता आणणार की पुन्हा एकदा गोंधळ माजवणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. पुढे काय घडते, हे जाणून घेण्यासाठी पाहा 'जाने अनजाने हम मिले' दररोज रात्री १०:३० वाजता फक्त झी टीव्ही वर!

# आळंदी आणि देहू संस्थाना पदाधिकारी आणि प्रशासन बैठक संपन्न

## देहू-आळंदीतून निघणाऱ्या दोन्ही पालख्याच्या पालखी मार्गावरील कामे १५ मेपूर्वी पूर्ण करावीत : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

पुणे (दै. संध्या) :



आगामी आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देहू व आळंदी पालखी मार्गावरील विविध विकासकामे १५ मे पूर्वी पूर्ण करण्यात यावीत, अशी स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी संबंधित विभागांना दिली. देहू व आळंदी संस्थानांकडून प्राप्त मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत प्रशासनामार्फत ठोस कार्यवाही करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

देहू ते देहू रोड या पाच किलोमीटरच्या रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील तीन किलोमीटर तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील दोन किलोमीटरचे काम संबंधित संस्थामार्फत पूर्ण करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले. या कामासाठी आवश्यक असलेले देहूरोड कटम मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठपुरावा करण्यात येईल, असे सांगण्यात आले. देहू येथील मंदिरापर्यंतचा सुमारे ५०० मीटर रस्ता नगरोत्थान योजनेतून पूर्ण करण्यात येणार आहे.

संत तुकाराम महाराज पालखीचा पहिला मुक्काम आकुर्डी येथे होत असल्याने जागेअभावी तात्पुरती जागा उपलब्ध करून देण्याबाबत संयुक्त पाहणी करून निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले. काळभोर नगर ते आकुर्डी येथील मेट्रोचे काम पालखीपूर्वी पूर्ण करावे, तसेच लोणी काळभोर येथील पालखी मुक्कामासाठी जागा वाढवून देण्यात येईल. गवळ्याची उंडवडी, सणसर व निमगाव केतकी येथील पालखी मुक्कामाच्या जागेचा प्रश्न प्रशासनामार्फत सोडविण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले.

आळंदी संस्थानाकडून आलेल्या मागण्यांबाबतही ठोस भूमिका घेत प्रशासनाला मुदत निश्चित करून कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावरील संचेतीपासून एफ.सी. रोडपर्यंत रात्री अखंडित प्रकाश व्यवस्था राहील याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले. बोरावके मळा ते सासवड दरम्यान नव्याने झालेल्या बायपास मार्गावरील अडथळे दूर करण्यात येतील. दिवेघाट येथे आवश्यक त्या ठिकाणी बॅरिकेड्स उभारण्यात येतील. पालखी मार्गावर कोणतीही वाहने बंद पडल्यास वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पालखी सोबत क्रेनची व्यवस्था ठेवण्याची दक्षता प्रशासन व पोलीस विभाग घेतील.

निरा येथील जुना पूल तात्काळ पाडण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी दिले. आळंदी येथील प्रलंबित रस्त्यांची कामे, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्धता तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीपर्यंतच्या मोठ्या रस्त्यांच्या कामांना गती देण्याच्या सूचना संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. आळंदी नगरपालिका क्षेत्रातील रस्ते रुंदीकरणाची कार्यवाही अधिक वेगाने पूर्ण करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

परतीच्या वारीदरम्यान आवश्यकतेनुसार रुग्णवाहिका उपलब्ध ठेवण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

या बैठकीत आळंदी व देहू संस्थानांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाने तातडीने बैठक घेऊन मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, जिल्हा आरोग्य अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, पालखी मार्गावरील संबंधित विभागांचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते, नगरपरिषदांचे मुख्याधिकारी, श्री गणेश मोरे, विश्वस्त, संत तुकाराम महाराज संस्थान देहू व योगी निरंगनाथ, विश्वस्त, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समिती आळंदी, तसेच अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

पुणे (दै. संध्या) :

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय, कला, वाणिज्य व विज्ञान सोमेश्वर नगर-वाघाळवाडी बारामती येथे २७ फेब्रुवारी २०२६ रोजी येथे सकाळी १० वाजता पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये जिल्ह्यातील औद्योगिक परिसरातील ३७ नामांकित उद्योजकांनी त्यांच्या सहभाग दर्शविलेला असून, त्यांच्याकडून ३ हजार ३५ रिक्तपदे भरण्यात येणार आहे. ही सर्व रिक्तपदे किमान १०वी, १२ वी पदवीधर, पदविका अशा विविध पात्रताधारक उमेदवारांसाठी असून बारामती तालुक्यातील अधिकाधिक नोकरी इच्छुक व बेरोजगार उमेदवारांना या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी रिक्तपदांबाबत अधिक माहितीसाठी करुन घेण्यासोबतच अर्ज करण्याकरिता www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## ४ लाख कोटींच्या निष्क्रिय गुंतवणुकीसाठी क्लिअरक्लेमची मोहीम

पुणे (दै. संध्या) :

भारतामध्ये सध्या सुमारे ४ लाख कोटी रुपयांची रक्कम शेअर्स, लाभांश आणि इतर आर्थिक मालमत्तांच्या स्वरूपात निष्क्रिय व अदावी असल्याचे समोर आले आहे. माहितीचा अभाव, जुनी कागदपत्रे हरवणे, पत्ता बदलणे किंवा मूळ गुंतवणूकदारांच्या निधनानंतर वारसांना माहिती नसणे अशा कारणांमुळे अनेक गुंतवणूकदारांना त्यांच्या हक्काची गुंतवणूक परत मिळवता येत नाही. या पार्श्वभूमीवर क्लिअरक्लेम या गुंतवणूकदार सेवा व रिकव्हरी प्लॅटफॉर्मने राष्ट्रीय पातळीवर जनजागृती मोहीम सुरू केली आहे.

सह-संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी (COO) हार्दिक मानेक यांनी सांगितले की, ग्राहकांचा विश्वास टिकवण्यासाठी पारदर्शकता आणि कार्यक्षम प्रक्रिया महत्त्वाची आहे. अनेक वर्षांच्या गोंधळानंतर संस्थेकडे येणाऱ्या ग्राहकांना स्पष्टता व समाधान देण्यावर कंपनीचे लक्ष आहे. समर्पित टीमच्या माध्यमातून क्लिअरक्लेम देशभरातील गुंतवणूकदार व त्यांच्या कुटुंबांना विस्मरणात गेलेली आर्थिक मालमत्ता परत मिळवून देण्याचे काम करत असून, त्यामुळे आर्थिक सुरक्षितता व विश्वास वाढण्यास मदत होत आहे.

जुन्या व विस्मरणात गेलेल्या गुंतवणुकी परत मिळवण्यासाठी क्लिअरक्लेम संपूर्ण प्रक्रियेसाठी मार्गदर्शन व सेवा उपलब्ध करून देत आहे. यामध्ये जुन्या शेअर्स व अदावी लाभांश परत मिळवणे, शेअर प्रमाणपत्रांचे डीमॅटमध्ये रूपांतर, मूळ धारकाच्या निधनानंतर शेअर्सचे ट्रान्समिशन, हरवलेली किंवा डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्रे मिळवून देणे, तसेच इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड (IEPF) कडे वर्ग झालेल्या शेअर्स व लाभांशाचे क्लेम या सेवांचा समावेश आहे.

डीमॅट प्रक्रियेत होणारा विलंब, गुंतवणुकीची कागदपत्रे गहाळ होणे किंवा कुटुंबीयांना गुंतवणुकीची माहिती नसणे यामुळे अनेक गुंतवणूकदार अडचणीत सापडतात. सलग सात वर्षे लाभांश न मिळाल्यास संबंधित शेअर्स IEPF कडे वर्ग होतात, ज्यामुळे त्यांना परत मिळवण्याची प्रक्रिया अधिक क्लिष्ट आणि वेळखाऊ ठरते.

क्लिअरक्लेमचे सह-संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत पंडोरे यांनी सांगितले की, गुंतवणूक क्लेमची प्रक्रिया सर्वसामान्यांसाठी अवघड असते. ती सोपी, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण करण्याचे संस्थेचे ध्येय आहे. अनेक कुटुंबांना त्यांच्या जुन्या गुंतवणुकीत दडलेली संपत्ती माहित नसते आणि ती योग्य मालकांपर्यंत पोहोचवणे हेच क्लिअरक्लेमचे व्हिजन आहे.

## महिला सक्षमीकरणाला चालना : सहकार्याने ई-बस ड्रायव्हर प्रशिक्षण पूर्ण

पुणे (दै. संध्या) :

एका मोबिलिटी, कॅपिटल रीजन अर्बन ट्रान्सपोर्ट (सीआरयूटी), ट्रॅव्हल टाइम आणि जीआयझेड यांच्या संयुक्त सहकार्याने २० महिला ड्रायव्हर्ससाठी आयोजित दोन आठवड्यांचा ई-बस ड्रायव्हर कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाला. पुण्यातील चाकण येथील एका मोबिलिटीच्या उत्पादन प्रकल्पात हा उपक्रम राबविण्यात आला.

डॉईश जेसेलशाफ्ट फर इंटरनॅशनल झुसामेनारबीट (जीआयझेड)ने आपल्या सीएसआर आराखड्याअंतर्गत या उपक्रमाला पाठिंबा दिला, तर ट्रॅव्हल टाइमने प्रशिक्षणाची अंमलबजावणी केली. सीआरयूटीच्या सार्वजनिक परिवहन ताफ्यात महिलांचे प्रमाण वाढवणे आणि इलेक्ट्रिक सार्वजनिक वाहतुकीच्या दिशेने राज्याच्या परिवर्तनाला चालना देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

या प्रशिक्षणात ई-बसचे प्रत्यक्ष ड्रायव्हिंग सत्र, तांत्रिक मॉड्यूल्स, रिजनरेटिव्ह ब्रेकिंग, अवजड वाहन हाताळणी, बॅटरी प्रणाली, ऊर्जा व्यवस्थापन, चार्जिंग प्रोटोकॉल्स, हाय-व्होल्टेज सुरक्षा आणि दैनंदिन तपासणी यांसारख्या महत्त्वाच्या घटकांचा समावेश होता. यासोबतच बचावात्मक ड्रायव्हिंग, रस्ते सुरक्षा, प्रवासी व्यवस्थापन आणि आपत्कालीन परिस्थितीतील प्रतिसाद यावरही विशेष भर देण्यात आला. संवाद कौशल्य, ग्राहक सेवा, आत्मविश्वास वाढ आणि व्यावसायिक आचारसंहिता यांसारख्या सॉफ्ट स्किल्सचेही प्रशिक्षण देण्यात आले, ज्यामुळे महिला चालक प्रत्यक्ष प्रवासी सेवेसाठी अधिक सक्षम बनल्या. तसेच उत्पादन प्रक्रिया, असेंब्ली लाईन, चाचणी सुविधा आणि चार्जिंग पायाभूत सुविधा यांचा मार्गदर्शित दौरा आयोजित करून इलेक्ट्रिक बसच्या कार्यप्रणालीबाबत सखोल माहिती देण्यात आली.

एका मोबिलिटीच्या ग्रुप प्रेसिडेंट रितिका मेहता यांनी सांगितले की, गतीशीलतेचे भवितव्य शाश्वत आणि सर्वसमावेशक असावे, हा आमचा विश्वास आहे. हा उपक्रम केवळ तांत्रिक प्रशिक्षणापुरता मर्यादित नसून रोजगाराच्या संधी निर्माण करणे, आत्मविश्वास वाढवणे आणि महिलांना सार्वजनिक परिवहनाच्या नेतृत्वासाठी सक्षम करणे हे त्यामागील उद्दिष्ट आहे. ट्रॅव्हल टाइमचे संचालक विवेक काळकर यांनी सांगितले की, प्रत्यक्ष रस्त्यावर ड्रायव्हिंग सराव, सेफ्टी ड्रिल्स आणि प्रवासी-केंद्रित दृष्टिकोनाच्या माध्यमातून महिला चालकांना पूर्णपणे कार्यक्षम बनविण्यावर भर देण्यात आला. सर्व २० सहभागींनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले असून त्या सीआरयूटीच्या इलेक्ट्रिक बस ताफ्यात सामील होण्यासाठी सज्ज आहेत.

हा उपक्रम ओडिशातील परिवहन क्षेत्रात महिला सक्षमीकरण, आर्थिक सहभाग आणि लैंगिक विविधतेला चालना देणारा ठरत असून भारतातील ईव्ही क्षेत्रासाठी एक अनुकरणीय मॉडेल म्हणून पुढे येत आहे.

## भेकराईमाता विद्यालयात दिमाखदार शिवजयंती सोहळा

फुरसुंगी (दै. संध्या) :



दि. १९ फेब्रुवारी रोजी श्री भेकराईमाता माध्यमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. श्री शंभू महादेव देवस्थान ट्रस्ट फुरसुंगी संस्थेचे cचेअरमन श्री सुजीत रुकारी, विश्वस्त श्री विजय हरपळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन करून करण्यात आली. मुख्याध्यापक डॉ. सुनील कामठे, उपमुख्याध्यापक सुनील दीक्षित, पर्यवेक्षक यास्मिन इनामदार, मारुती खेडकर, प्राथमिकचे मुख्याध्यापक राहुल घोंगडे, राजश्री हरपळे तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, सेवक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत शिवरायांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी पारंपारिक पद्धतीने उत्साहपूर्ण वातावरणात शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भाषणे आणि शिवराज्याभिषेक सोहळ्याचा नाट्यप्रयोग सादर करून वातावरण भारावून टाकले आणि उपस्थितांची मने जिंकली.

## मोक्का गुन्ह्यातील आरोपीला पोलिसांनी केले जेरबंद

पुणे (दै. संध्या) :

गेल्या आठ महिन्यापासून पाहिजे आरोपी मयूर उर्फ मन्या मोतीराम राठोड वच २५ वर्ष राहणार सर्व्हे नं. १०, कामराज नगर, येरवडा हा डेक्कन कॉलेज दर्ग्याजवळ येरवडा येथे उभा आहे असे पोलिसांना कळाले पोलीस अंमलदार राहुल परदेशी व पोलीस अंमलदार अक्षय शिंदे यांनी ही माहिती लगेचच वरिष्ठ पोलीस निरीक्षक लक्ष्मी नगर रवींद्र कदम यांना कळविली.या माहितीची खात्री करून वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर लगेचच पोलीस अंमलदार राहुल परदेशी व पोलिस अंमलदार अक्षय शिंदे यांनी डेक्कन कॉलेज समोर गाडी पार्क करून बातमीच्या ठिकाणाची व्यवस्थित पाहणी केली पाहणी केली असता मयूर मोतीराम राठोड हा तेथे बसलेला पोलिसांना दिसला व त्यांनी लगेच त्याला ताब्यात घेतले.त्याची चौकशी केली असतात्याने आपले नाव मयूर राठोड असे सांगितले त्या पद्धतीने गुन्हाच्या अनुषंगाने त्याच्याकडे प्राथमिक तपास केले असता त्याने सांगितले कि दिनांक २७/०६/२०२५ रोजी ११.३० वाजता आदित्य शाम गाडे याला गुंजन चौक येथे मारहाण केली आहे. सदर इस्मा बाबत येरवडा पोलीस स्टेशन मध्ये संपर्क साधून माहिती घेतली असता येरवडा पोलीस स्टेशन गु. रजि. नं. ४३६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम११८(२) ३(५) १८२(२) १८९(२) १८९(४) १८९(३) १९१(२) १९१(३) १९० सह कलम ४, २५ भा. ह. का.कलम ३७(१) ब, १३ मकोका सह कलम 3,७ क्रिमीनल लॉ (अॅमेंडमेंट) अॅक्ट प्रमाणे दाखल असलेली व सदर गुन्हा संदर्भात विचारले असता त्याने वरील गुन्हा त्याच्या साथीदारासह केली असल्याची कबुली दिली. सदर आरोपीस सहाय्यक पोलीस आयुक्त येरवडा विभाग पुणे शहर यांच्या समक्ष हजर केले असता सहाय्यक पोलीस आयुक्त येरवडा विभाग पुणे शहर यांनी त्याला अटक केली आहे.

# बहुजनांच्या विकासासाठी ठोस योजना जाहीर करा

## बहुजन नेते डॉ. हुलगेश चलवादी यांची मागणी

पुणे (दै. संध्या) :

■ अजित पवारांच्या नावाने बहुजन विकास योजना जाहिर करण्याचे आवाहन



राज्यपालांच्या अभिभाषणात महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचे आणि गुंतवणुकीचे चित्र रंगविण्यात आले असले, तरी सामान्य बहुजन समाजाच्या विकासासाठी ठोस उपाययोजनांचा उल्लेख आढळत नाही, अशी खंत बहुजन नेते व माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी सोमवारी (ता.२३) व्यक्त केली. पुढील महिन्यात सादर होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने बहुजनांच्या विकासासाठी मोठी योजना जाहीर करा, अशी मागणी डॉ.चलवादी यांनी केली.

केवळ ७० लाख कोटी रुपयांच्या सामंजस्य करारांची घोषणा आणि कागदावरील गुंतवणुकीचे आकडे सांगून बहुजन तरुणांच्या हाताला शाश्वत रोजगार मिळणार नाही. २०२६ ते २०३० या कालावधीत ५० लाख नोकऱ्या निर्माण करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र या नोकऱ्यांमध्ये सर्वांना समान संधी मिळेल, याची काळजी सरकारने घ्यावी; अशी भूमिका डॉ.चलवादी यांनी मांडली.

परकीय गुंतवणूक (एफडीआय) वाढविण्याचे प्रयत्न होत असताना सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांशी संबंधित बहुजन उद्योजकांसाठी विशेष सवलती किंवा प्रोत्साहनपर उपायांची घोषणा करण्यात यावी, अशी अपेक्षा आहे. राज्य सरकारचा अर्थसंकल्प मांडत असतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याची काळजी घेतील, असा विश्वास आहे. गुंतवणुकीचा प्रत्यक्ष फायदा तळागाळातील समाजघटकांपर्यंत पोहोचला पाहिजे, असे डॉ.चलवादी म्हणाले.

सरकारकडून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित कृषी धोरण तसेच समृद्धी महामार्गाच्या विस्तारासारख्या प्रकल्पांचा उल्लेख केला जात असला, तरी ग्रामीण भागातील दलित व वंचित घटकांतील शेतकरी अद्यापही मूलभूत पायाभूत सुविधांपासून दूर आहेत. औद्योगिक कॉरिडॉर किंवा स्टील हब उभारणीसोबतच अशा प्रकल्पांमुळे विस्थापित होणाऱ्या बहुजन समाजाच्या पुनर्वसन व रोजगाराची हमी देणे आवश्यक असल्याचे डॉ.चलवादी यांनी अधोरेखित केले.

डॉ.चलवादी यांनी उच्च शिक्षण शिष्यवृत्तीत वाढ, अद्ययावत शासकीय रुग्णालयांचे जाळे आणि विकास महामंडळांद्वारे सुलभ कर्ज देण्याची मागणी केली. तसेच, नव्या गुंतवणुकीत स्थानिक बहुजन तरुणांना प्राधान्य देण्यासाठी कायदेशीर तरतूद करण्याचे आवाहन केले.

महाराष्ट्राचे देशाच्या एकूण जीडीपीतील योगदान लक्षणीय आहे, ही अभिमानाची बाब आहे. मात्र या विकासप्रक्रियेत समाजातील शेवटच्या घटकाचा सहभाग आणि सक्षमीकरण महत्त्वाचे आहे. केवळ भांडवली गुंतवणुकीच्या घोषणा न करता बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस आर्थिक पॅकेज आणि कल्याणकारी योजना राबविण्याची गरज आहे, असे डॉ. चलवादी यांनी नमूद केले.


## थोडक्यात पण महत्वाचे...

### Physics Wallahच्या 16 विद्यार्थ्यांची JEE Main 2026 मध्ये दमदार कामगिरी



पुणे (दैनिक संध्या) : JEE Main २०२६ (सेशन १) परीक्षेत पुण्यातील Physics Wallah (पीडब्ल्यू) संस्थेच्या १६ विद्यार्थ्यांनी ९८.५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यापैकी पुण्यातील निवासी जिशान सुरज तांबोळी याने ९९.७६ टक्के गुण मिळवत विशेष लक्ष वेधले. ९९ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये तो आघाडीवर राहिला. प्रथमेश खोरे (९९.५९ टक्के) आणि सोनिया धोंद्रे (९९.४७ टक्के) यांनीही उत्कृष्ट कामगिरी करत शहराचे नाव उज्ज्वल केले. या निकालानंतर विद्यार्थ्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. National Testing Agency (एनटीए) यांनी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी JEE Main सेशन १चा निकाल जाहीर केला. ही परीक्षा देश-विदेशातील ६५८ केंद्रांवर पार पडली होती. देशभरातील विविध राज्यांमध्येही पीडब्ल्यूच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले. जम्मू-काश्मीरमधील अमितेश्वर सिंग (९९.८३ टक्के), मेघालयमधील विष्णू भारद्वाज उपाध्याय (९८.९६ टक्के) आणि अंदमान-निकोबार बेटांतील हेमाक्षी कुमार (९८.२६ टक्के) यांनी आपल्या राज्यात अव्वल स्थान पटकावले. पीडब्ल्यूच्या तंत्रज्ञान-सक्षम विद्यापीठ केंद्रातून तयारी केलेल्या जिशानने विषयानुसारही उच्च गुण मिळवले. भौतिकशास्त्रात ९९.५५ टक्के, रसायनशास्त्रात ९९.७२ टक्के आणि गणितात ९९.४४ टक्के गुण मिळवत त्याने सर्वांगीण प्रावीण्य सिद्ध केले. पीडब्ल्यूचे विद्यापीठ-ऑफलाइनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित गुप्ता यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील JEE Advanced परीक्षेसाठी अधिक जोमाने तयारी करण्याचे आवाहन केले. अपेक्षित गुण न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी निराश न होता पुढील सेशनसाठी प्रयत्न सुरू ठेवावेत, असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विविध भौगोलिक भागांतील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांची तयारी अधिक सुलभ करण्याच्या पीडब्ल्यूच्या प्रयत्नांना बळ मिळाल्याचे मानले जात आहे. ऑनलाइन, ऑफलाइन आणि हायब्रिड शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

### 'घरवाली पेडवाली'च्या सेटवर सीरत कपूरची पोपट 'रिओ'सोबत खास मैत्री



पुणे (दैनिक संध्या) : घरवाली पेडवाली या अलौकिक शक्तींवरील हॉरर-कॉमेडी मालिकेत सावीची भूमिका साकारणारी अभिनेत्री सीरत कपूर सेटवरील उत्साही उपस्थितीसाठी ओळखली जाते. नुकत्याच झालेल्या शूटिंगदरम्यान तिला एक अनोखा सहकलाकार मिळाला—'रिओ' नावाचा प्रशिक्षित पोपट. या अनपेक्षित सहवासामुळे शूटिंगदरम्यान हलकाफुलका आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. दीर्घकाळ चालणाऱ्या शूटिंगमध्ये रिओसोबत झालेली मैत्री सीरतसाठी संस्मरणीय ठरली. या अनुभवाबद्दल बोलताना ती म्हणाली, "मी पहिल्यांदाच पक्ष्यासोबत, विशेषतः पोपटासोबत शूटिंग करत होते. रिओ उत्तम प्रशिक्षित आहे आणि सीनदरम्यान शिस्तबद्धपणे प्रतिक्रिया देतो. त्याच्यासोबत गप्पा मारणे आणि संवाद साधणे अभिनेत्री म्हणून माझ्यासाठी खूप रोमांचक अनुभव होता." सीरतने सांगितले की, सध्याच्या एपिसोडमध्ये तिच्या पात्राचे रिओसोबत काही हृदयस्पर्शी आणि हलकाफुलके प्रसंग आहेत, जे प्रेक्षकांना नक्की आवडतील. शूटिंगदरम्यान पोपटाची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षकांनी विशेष लक्ष दिले—वेळेवर अन्न, पुरेसे ब्रेक आणि आरामदायी वातावरण यामुळे संपूर्ण युनिटला समाधान वाटले. ती पुढे म्हणाली, "माझ्या आयुष्यात याआधी कुठलाही पाळीव प्राणी नव्हता, त्यामुळे हा अनुभव पूर्णपणे वेगळा आणि आनंददायी होता. रिओसोबत वेळ घालवताना प्राण्यांसोबतचे नाते किती खास असते याची जाणीव झाली. भविष्यात मला पाळीव कुत्रा ठेवण्याचीही इच्छा आहे." या अनोख्या अनुभवामुळे मालिकेच्या कथानकातही एक वेगळी मोहकता आली असल्याचे निर्मिती टीमचे मत आहे. प्रेक्षकांना सावी आणि रिओ यांच्यातील संवाद असलेले भाग लवकरच पाहायला मिळणार आहेत. सीरत कपूरला सावीच्या भूमिकेत घरवाली पेडवाली या मालिकेत दर सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता एंड टीव्हीवर पाहता येईल. तसेच मालिकेचे सर्व भाग ZEE5वरही उपलब्ध आहेत.

### "कॉलेजमध्ये असताना मुलींची छेड काढणाऱ्यांना मी थेट जाब विचारायचे."



पुणे (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील 'लक्ष्मी निवास' मालिकेत सध्या भूमिका आणि राज बुंदेला यांच्या भोवती फिरणारे एक रोचक कथानक सुरू आहे. श्रीनिवास आणि लक्ष्मी यांची धाकटी मुलगी रिया मुंजाल साकारत असलेली भूमिकाच्या आयुष्यात अचानक करोडपती राज बुंदेला (प्रियॅम गुज्जर) प्रवेश करतो आणि त्यानंतर अनेक अनपेक्षित बदल घडू लागतात. भूमिकाला पाहताच तिच्याकडे आकर्षित झालेला राज, पहिल्याच दिवशी तिच्या कुटुंबीयांकडे विवाहाचा प्रस्ताव घेऊन धाडसाने उपस्थित होतो. कठीण प्रसंगी कुटुंबाला दिलेल्या त्याच्या सातत्यपूर्ण आधारामुळे, श्रीनिवास आणि कुटुंबीय हळूहळू त्याच्यावर विश्वास ठेवू लागतात आणि त्याच्या प्रस्तावाचा गंभीरपणे विचार करू लागतात. भूमिकाच्या प्रवासाला अनेक स्तर आहेत. उत्साही, मनमोकळी आणि आनंदी भूमिका अचानक अशा परिस्थितीत सापडते, ज्यासाठी भावनिकदृष्ट्या ती तयार नसते. कथानक पुढे सरकत असताना प्रेक्षकांना कुटुंबाच्या अपेक्षा सांभाळणे, स्वतःच्या भावना आणि निर्णय ऐकणे आणि स्वतःचा आवाज शोधण्याचा धैर्याने केलेला प्रयत्न असा तिचा अंतर्गत संघर्ष पाहायला मिळतो.

# महापालिका शिक्षण समिती अध्यक्षांसोबत शिक्षक संघटनांचा संवाद

**भिवंडी (दै. संध्या) :**



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण समितीच्या अध्यक्षा मा. श्रीमती राजेश्री शिरवडकर यांच्या सोबत शिक्षण तज्ञ डॉ.विशाल कडणे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी आयोजित संयुक्त बैठकीत मराठी शाळांचे संस्थाचालक व शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले. या बैठकीत महामुंबई शिक्षण संस्था, मुंबई शहर शिक्षक विकास मंडळ तसेच विविध शैक्षणिक संघटनांनी शिक्षणाशी संबंधित गंभीर व प्रलंबित प्रश्नांवर निवेदन सादर करून सविस्तर चर्चा केली. संघटनेच्यावतीने अध्यक्ष सदानंद रावराणे, उपाध्यक्ष राजेंद्र प्रधान, कार्यवाह डॉ. विनय राऊत, शिक्षक नेते डॉ. विशाल कडणे तसेच फादर स्वामी यांनी नवनिर्वाचित शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांचे अभिनंदन करून शाळांच्या हितासाठी विधायक संवाद साधला.

सादर केलेल्या निवेदनात शाळांवरील वीज, पाणी व इतर कर निवासी दराने आकारणी करण्याची मागणी, मालमत्ता करातून संपूर्ण सूट, आरटीई कायदा २००९ अंतर्गत अनावश्यक मुदतवाढ प्रक्रिया रद्द करणे, तसेच २५% आरटीई अंतर्गत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीची प्रलंबित रक्कम तातडीने अदा करण्याची मागणी करण्यात आली.

याशिवाय, बीएमसी इमारतींमध्ये कार्यरत अनुदानित मराठी व प्रादेशिक माध्यमांच्या शाळांवरील वार्षिक १०% भाडेवाढ स्थगित करणे, भाडेतत्त्वावर दिलेल्या वर्गखोल्यांची संख्या कायम ठेवणे, वेतनेतर अनुदानाचा प्रश्न सोडवणे, तसेच शिक्षक व लिपिकांच्या रिक्त पदांमुळे निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्याची मागणी करण्यात आली. प्राथमिक अनुदानित शाळांसाठी सरल (SARAL) पोर्टल लॉगिन उपलब्ध नसल्याने शिक्षक भरती व प्रशासकीय प्रक्रिया प्रलंबित राहात असल्याची बाबही अधोरेखित करण्यात आली. शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांनी सर्व मुद्द्यांची सकारात्मक दखल घेतली असून, पुढील ८ ते १० दिवसांत पुन्हा बैठक आयोजित करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. ही बैठक शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नांवर विधायक संवाद घडवून आणणारी ठरली असून, महानगरपालिका क्षेत्रातील शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी आणि सर्व स्तरांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## आंबेगाव तालुका मराठी पत्रकार संघाला 'वसंतराव काणे आदर्श' पुरस्कार

**मंचर (दै. संध्या) :**

आंबेगाव तालुका मराठी पत्रकार संघाला (स्व.) वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार कर्जत (ता. रायगड) येथे रविवारी (ता.२२) प्रदान करण्यात आला. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद यांच्या वतीने देण्यात येणारा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार यंदा पुणे विभागातील साठ तालुक्यांमधून एकमेव आंबेगाव तालुका मराठी पत्रकार संघाला जाहीर झाला होता. 'आंबेगाव तालुका मराठी पत्रकार संघाने पत्रकार व कुटुंबियासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर, पत्रकारांसाठी राज्यस्तरीय कार्यशाळा, वृक्ष लागवड व संवर्धन, व्यसन मुक्ती याबाबत ही जनजागृतीचे काम पत्रकार संघाने प्रभावीपणे केले. त्यामुळे पुणे आंबेगाव तालुका मराठी पत्रकार संघाला 'वसंतराव काणे आदर्श' पुरस्कार देण्यात आला.' असे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांनी सांगितले. खासदार श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई, एस. एम. देशमुख, किरण नाईक, मंदार फणसे, शरद पाबळे व सुनील लोणकर यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. पत्रकार संघाचे संस्थापक डी. के. वळसे पाटील, अध्यक्ष संतोष वळसे पाटील तसेच डिजिटल मीडियाचे अध्यक्ष सचिन तोडकर यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## PURE EV नेवासा दाखल; ई-मोबिलिटीला मिळणार नवी गती

**नेवासा (दै. संध्या) :**




भारतातील अग्रगण्य इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादकांपैकी एक असलेल्या PURE EV कंपनीने नेवासा येथे आपल्या नव्या शोरूमचे उद्घाटन करून ग्रामीण व उपनगर भागात ईव्ही क्रांतीला नवी चालना दिली आहे. गांधी नगरसमोर, विकास फर्निचरजवळ नेवासा-नेवासा फाटा रोड येथे सुरू झालेल्या या शोरूममध्ये कंपनीच्या अत्याधुनिक इलेक्ट्रिक स्कूटर्स व मोटारसायकल्सची संपूर्ण श्रेणी उपलब्ध करण्यात आली आहे.

नवीन शोरूममध्ये लोकप्रिय ePluto 7G Max आणि eTryst X यांसारखी मॉडेल्स ग्राहकांसाठी प्रदर्शित करण्यात आली असून, स्थानिक नागरिकांना पर्यावरणपूरक आणि किफायतशीर प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. यासोबतच PuREPower या ऊर्जा साठवणूक उत्पादनांचीही (Energy Storage) श्रेणी येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे घरे व व्यवसायांसाठी स्वच्छ ऊर्जेचा वापर सुलभ होणार आहे.

कंपनीच्या मते, हा विस्तार PURE EV च्या देशव्यापी वाढीच्या धोरणातील महत्त्वाचा टप्पा आहे. स्वदेशी संशोधन व उत्पादनावर भर देत कंपनी इलेक्ट्रिक मोबिलिटी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहे. पुढील ३० महिन्यांत देशभरात २५० नवीन डीलरशिप सुरू करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट असून, त्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील नेटवर्क ३२० पेक्षा अधिक आउटलेट्सपर्यंत विस्तारण्याची योजना आहे.

लांब पल्ल्याच्या ईव्ही वाहनांची वाढती मागणी, सरकारच्या अनुकूल धोरणे आणि वाढती जनजागृती यामुळे इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर नेवासा येथे सुरू झालेले PURE EV चे शोरूम स्थानिक ग्राहकांसाठी पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध करून देण्यासोबतच स्वच्छ मोबिलिटी आणि ऊर्जा स्वातंत्र्याकडे भारताच्या वाटचालीस पाठबळ देणार असल्याचे कंपनीने सांगितले.

## *या उन्हाळ्यात कन्फर्मटीकेटसह ट्रेन प्रवास अधिक फायदेशीर बनवा, १% कॅशबॅक ऑफर सुरू*

### ९० दिवसांच्या आत तुमच्या पुढील बुकिंगवर अमर्यादित कॅशबॅक

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**




कन्फर्मटीकेट, भारतातील आघाडीचे अधिकृत B2C ऑनलाइन ट्रेन तिकीट आणि प्रवास उपयुक्तता प्लॅटफॉर्म, ixigo ग्रुपमध्ये सामील व्हा. उन्हाळी हंगामाच्या अनुषंगाने, कन्फर्मटीकेटने मर्यादित कालावधीसाठी १% कॅशबॅक ऑफरची घोषणा केली आहे. कन्फर्मटीकेट ॲपवर ट्रेन तिकिटे बुक करणाऱ्या वापरकर्त्यांना त्यांच्या कन्फर्मटीकेट वॉलेटमध्ये थेट १% कॅशबॅक मिळेल. या कॅशबॅकवर कोणतीही कमाल मर्यादा नाही, म्हणजेच वापरकर्ते त्यांना हवे तितके कॅशबॅक दावा करू शकतात. ही ऑफर ३१ मे २०२६ पर्यंत संपूर्ण उन्हाळी प्रवास हंगामात चालेल. प्रवासी संपूर्ण ऑफर कालावधीत अमर्यादित कॅशबॅक मिळवू शकतात. क्रेडिटच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत त्यांच्या पुढील ट्रेन बुकिंगवर हा कॅशबॅक दावा करता येईल. कुटुंबे, विद्यार्थी आणि सुट्टीतील लोकांसाठी हा अतिरिक्त फायदा असेल. तुम्हाला लक्षणीय बचतीचा फायदा होईल, विशेषतः जेव्हा तुम्ही अनेक ट्रिपचे नियोजन करता. बुकिंग केल्यावर कॅशबॅक आपोआप तुमच्या वॉलेटमध्ये जमा होईल, ज्यामुळे संपूर्ण प्रक्रिया सोपी आणि अखंड होईल. या उपक्रमाबद्दल भाष्य करताना, ixigo ट्रेन्स आणि कन्फर्मटीकेटचे सीईओ दिनेश कुमार कोठा म्हणाले, "उन्हाळा हा भारतातील प्रवासासाठी सर्वात व्यस्त काळ आहे. या काळात कुटुंबे, विद्यार्थी आणि व्यावसायिक मोठ्या संख्येने ट्रेनने प्रवास करतात. ३१ मे पर्यंत चालणारी ही ऑफर प्रवाशांना त्यांच्या सुट्ट्या आणि परतीच्या ट्रिपमध्ये महत्त्वपूर्ण फायदे देईल. कॅशबॅकवर कोणतीही मर्यादा न ठेवता आणि रिडेम्पशन सोपे करून, आम्ही प्रवाशांना अधिक बचतीसह विश्वासार्हपणे प्रवास करता येईल याची खात्री करत आहोत. ट्रेन बुकिंग अधिक सोपे, पारदर्शक आणि फायदेशीर बनवण्याचे आमचे ध्येय आहे."

कन्फर्मटीकेट तंत्रज्ञान-आधारित आणि ग्राहक-केंद्रित सेवांद्वारे प्रवास अनुभवांमध्ये सतत सुधारणा करत आहे.

# पुण्याच्या विनाशाकडे नेणाऱ्या मेट्रो आणि बोगदा प्रकल्पांना कडाडून विरोध

### निवृत्त कर्नल सुरेश पाटील यांचा प्रशासनाला इशारा

**पुणे (दै. संध्या) :**

पुणे शहराच्या नियोजनाच्या नावाखाली सुरू असलेले अवाढव्य मेट्रो प्रकल्प आणि खडकवासला ते फुरसुंगी दरम्यानचा प्रस्तावित बोगदा हे प्रकल्प सामान्य नागरिकांच्या हिताचे नसून शहराचा विनाश करणारे आहेत, असा गंभीर आरोप ग्रीन थम्सचे संस्थापक अध्यक्ष निवृत्त कर्नल सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाटील यांनी केला आहे. आज आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी मेट्रो, वाहतूक कोंडी आणि पाणी प्रश्नावर प्रशासनावर कडक शब्दांत ताशेरे ओढले.

यावेळी बोलताना निवृत्त कर्नल सुरेश पाटील यांनी खालील प्रमुख मुद्दे मांडले:

१. मेट्रो प्रकल्प की कँक्रीटचे जंगल?

आज जगभरात एलआरटी (LRT) आणि चीनसारख्या देशांत जमिनीवरून धावणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत असताना, पुण्यात मात्र अवाढव्य बांधकामे आणि प्लॅटफॉर्म उभारले जात आहेत. मेट्रोच्या दोन्ही बाजूंना ५० मीटरपर्यंत ४ एफएसआय (FSI) देऊन जिथे बंगले होते तिथे टॉवर्स उभे केले जात आहेत. यामुळे एका स्कूटरच्या जागी आता शेकडो वाहने



येतील, ज्यामुळे वाहतुकीचा प्रश्न सुटण्याऐवजी अधिक जटील होईल.

२. ३२ कि.मी.चा बोगदा हा 'मूर्खपणा':

खडकवासला धरणापासून फुरसुंगीपर्यंत दीड-दोन टीएमसी पाणी वाचवण्यासाठी ३२ किलोमीटरचा बोगदा कशासाठी? असा प्रश्न त्यांनी विचारला. त्याऐवजी धरणातील गाळ (माती) काढला तर साठवण क्षमता वाढेल आणि ती माती शेतकऱ्यांना दिल्यास त्यांचे उत्पन्न चौपट होईल. या बोगद्यातून निघणारा प्रचंड मलबा टाकायचा कुठे, याचे उत्तर प्रशासनाकडे नाही.

३. कालव्यालगतचे रस्ते खुले करा:

पुण्यातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून कालव्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या जागांचा वापर दुचाकींसाठी (टू-व्हीलर) रस्ता म्हणून करावा. हे रस्ते मोकळे केल्यास वाहतुकीचा मोठा भार हलका होईल, मात्र प्रशासन या जागांकडे दुर्लक्ष करून तिथे कचरा साचू देत आहे, ही खेदाची बाब आहे.

४. पाण्यासाठी रडणारी जनता आणि एसीमधील अधिकारी:

पुण्याला आपण 'विद्येचे माहेरघर' म्हणतो, पण आज पुण्यात टँकरराज सुरू आहे. गरीब महिला पाण्यासाठी मैलोन्मैल भटकत आहेत आणि दुसरीकडे अधिकारी एसी ऑफिसमध्ये बसून लाखो रुपये पगार घेत आहेत. ७० टक्के जनतेला पाणी मिळत नाही, हे प्रशासनाचे मोठे अपयश आहे.

### प्रशासनाला आवाहन

"पत्रकार बंधूंनी या प्रश्नावर आयुक्तांना आणि पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारावा. मेट्रोचे प्लॅटफॉर्म आणि हे चुकीचे प्रकल्प थांबवले पाहिजेत. पुढच्या पिढीसाठी आपण एक चांगले आणि राहण्यायोग्य शहर सोडले पाहिजे," असे कळकळीचे आवाहन निवृत्त कर्नल सुरेश पाटील यांनी शेवटी केले.

# 'हिंद-दि चादर' कार्यक्रमास जाणाऱ्या भाविकांसाठी वाहतूक व्यवस्थापन

### जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी भाविकांनी नजीकच्या गुरुद्वाराशी संपर्क साधून नाव नोंदविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**पुणे (दै. संध्या) :**




'हिंद-दि चादर' कार्यक्रमास जाणाऱ्या भाविकांसाठी पुणे महानगरपालिका व पिपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून वाहनांची व्यवस्था आली असून भाविकांनी नजीकच्या गुरुद्वाराशी संपर्क साधून आपले नाव नोंदवावे, याकरिता आधार कार्डची एक प्रत व भ्रमणध्वनी क्रमांक उपलब्ध करुन द्यावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे. शीख धर्माचे ९ में गुरू श्री गुरु तेग बहादुर साहिबनी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्ता साहिबचा गौरवशाली इतिहास नागरिकांना माहिती होण्यासोबतच त्यांचे बलिदान स्मरण राहण्याकरिता २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी ओवे मैदान, सेक्टर २९, खारघर, नवी मुंबई येथे "हिंद-दि चादर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे; या कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून भाविकांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता कार्यवाही करण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार विभागीय आयुक्त, पुणे विभाग व जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी यांनी कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत आढावा बैठका घेतल्या आहेत. या बैठकांमध्ये जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर कार्यक्रमाची प्रचार व प्रसिद्धी करण्याबाबत संबंधित विभागाला निर्देश देण्यात आलेले आहेत.

सर्व जिल्हा परिषद आणि खाजगी शाळांमध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबनी यांच्या जीवनावर आधारित निबंध, वकृत्व स्पर्धा, प्रभात फेरी आणि सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच आरोग्य विभागामार्फत आरोग्य पंधरवडा राबविण्यासोबतच विविध वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. महानगरपालिका क्षेत्रातील मल्टिप्लेक्स व एक पडदा चित्रपट गृहांमध्ये हिंद-दि-चादर या गाण्याची चित्रफीत दाखविणे.

पोलीस विभाग, प्रादेशिक परिवहन विभाग आणि महामार्ग पोलीस यांच्यामार्फत जिल्ह्यातून किती जनसमुदाय कार्यक्रमास उपस्थित राहणार आहे याची माहिती, वाहनांची ट्रॅकिंग करणे आदी अनुषंगीक माहिती पनवेल येथील पोलीस व प्रादेशिक परिवहन विभागास उपलब्ध करुन देणे. राष्ट्रीय महामार्ग पोलिस अधीक्षक यांच्या मार्फत महामार्गावरून जाणाऱ्या भाविकांच्या वाहनांसाठी विशेष वाहतूक आराखडा तयार करून सुरक्षित प्रवास सुनिश्चित करणे, अशा सूचना जिल्हा प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

**शिरूर नगरपरिषद, घोडनदी**

मा. शहर नियोजन प्राधिकरण तथा मुख्याधिकारी, नगर परीषद शिरूर यांचे कार्यालय

एन.ए.पी / शिरूर /२०२५-२६.

**जाहीरनामा**

(दिनांक. २३/०२/२०२६)

श्री. हरकचंद माणिकलाल खाबीया, रा. शिरूर यांनी मौजे शिरूर ता. शिरूर जि.पुणे सर्व्हे नं. गट नं.२८/१/अ.२८/३ व २९ मधील क्षेत्रफळ १.५९५ हे.आर. मालकीची व ताब्यातील जमिन "निवासी" प्रयोजनासाठी अकृषिक करुन मिळणेसाठी व या जमिनीचा अभिन्यासास विकास परवानगी मंजुर करण्याबाबतच्या परवानगीकरीता या कार्यालयास ऑनलाईन BPMS प्रणालीद्वारा आवश्यक कागदपत्रांसह अर्ज दाखल केला आहे. उक्त जमिन निवासी मध्ये रुपांतरीत कारणास्तव कोणाच्या काही हरकती अथवा आक्षेप असल्यास त्या दि. ०२/०३/२०२६ पूर्वी या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. उक्त मुदतीनंतर आलेल्या हरकती अथवा आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी. कळावे.

सही/-

मा. शहर नियोजन प्राधिकरण तथा मुख्याधिकारी, करिता
शिरूर नगर परीषद, घोडनदी.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या जयंती निमित्त अभिवादन

पिंपरी(दैनिक संध्या) : अंधश्रध्दा, अस्वच्छता निर्मुलनासाठी आयुष्यभर आपले जीवन व्यतीत करणारे थोर समाजसुधारक, कीर्तनकार संत गाडगेबाबा यांनी स्वच्छता हीच खरी सेवा मानून समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांच्या विचारांचा आदर्श घेत नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव रुजवणे ही आजच्या काळातील खरी गरज आहे. समाजात सकारात्मक बदल घडवायचा असेल तर त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. या अभिवादन प्रसंगी नगरसदस्य अनुराधा गोरखे, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते यशवंत कन्हेरे, विशाल जाधव, निखील दळवी, मुरलीधर दळवी, अर्थव साईकर, सुधीर जमदाडे, आकाश कांबळे तसेच महापालिका कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते. थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांनी स्वच्छता, समाजप्रबोधन आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसाठी केलेल्या कार्याची आठवण यावेळी उपस्थितांनी जागवली. त्यांच्या विचारांचा आदर्श ठेवून समाजात स्वच्छता व सामाजिक बांधिलकी जपण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.



### दिशा सोशल फाऊंडेशनच्यावतीने महापौर रवी लांडगे यांचा सत्कार

पिंपरी(दैनिक संध्या) : दिशा सोशल फाऊंडेशनच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर रवीभाऊ लांडगे यांचा सोमवारी (दि.२३) पिंपरी येथे सत्कार करण्यात आला. सत्कारासाठी बुके किंवा इतर भेटवस्तू न देता पुस्तके व वह्यांचे संच द्यावेत, असे महापौरांनी सोशल मीडियावर आवाहन केले होते. त्यानुसार, दिशा सोशल फाऊंडेशनचे माजी कार्याध्यक्ष सचिन साठे आणि संचालक ॲड. अविनाश ववले यांच्या हस्ते वह्या व शालोपयोगी वस्तू देऊन महापौरांचा सत्कार करण्यात आला. तसेच युवा उद्योजक शिवराज काटे यांचा देखील सन्मान कार्याध्यक्ष राजेंद्र करपे यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी भारतीय जनता पार्टीचे माजी शहराध्यक्ष सदाशिव खाडे, दिशा सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब जवळकर, माजी अध्यक्ष गोरख भालेकर, संचालक गणेश लंगोटे, राजेश सावंत, शरीफ शेख आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदकुमार कांबळे यांनी केले, तर उपाध्यक्ष संतोष बाबर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### महापालिकेच्या सभेत 'ठरावां'वरून वाद

पिंपरी(दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेची तहकूब विशेष सभा शुक्रवारी (दि. 20) झाली. त्यात स्थायी समिती आणि विविध विषय समितीच्या सदस्यांची निवड हे विषय होते. ते विषय बाजूला सारून सभागृहात नवनिर्वाचित नगरसेवकांनी तब्बल पाच तास आपल्या भावना व्यक्त करत प्रशासनावर आगपाखड केली. त्यात काही विषय महापौर रवी लांडगे यांनी मंजुर केल्याचे घोषित केले. मात्र, नियमानुसार ते अधिकृत ठराव नसल्याचे स्पष्ट होत आहे. ती केवळ नगरसेवकांची भावना असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. महापौर व उपमहापौर तसेच, स्थायी समिती आणि विविध विषय समितीच्या सदस्यांची निवडीसाठी महापालिकेची विषय सभा सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या अध्यक्षतेखाली 6 फेब्रुवारीला झाली. त्या सभेत महापौर व उपमहापौर यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित महापौर रवी लांडगे यांनी ती सभा शुक्रवार (दि.20) दुपारी एकपर्यंत तहकूब केली. तहकूब सभेत विषयपत्रिकेनुसार स्थायी समिती आणि विविध विषय समितीच्या सदस्यांची निवड करणे अपेक्षित होते. मात्र, महापौर रवी लांडगे यांनी भाजपाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या सुचनेवरून सभागृहात नवविर्चाचित नगरसेवकांना चर्चा करण्यास सहमती दिली. त्यासाठी केवळ तासभराचा वेळ दिला. मात्र, शहरातील मोकाट कुत्री, पाणीटंचाई, कचर्याचे ढीग, रस्त्यांवरील खड्डे, वाहतूक कोंडी, पीएमपीएल बसची अपुरी संख्या, खराब ड्रेनेजलाईन, निगडी ते पिंपरी मार्गावर मेट्रोच्या कामामुळे रस्त्याची दुरवस्था, मालमत्ताकर भरण्यास अभय योजना, डीपीवर सुनावणी, स्मार्ट सिटीची दर्जाहीन कामे तसेच, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे सभागृहात तैलचित्र उभारणे, नवीन महापालिका भवनाच्या आवारात अजितसृष्टी उभारणे आदी विषयांवर तब्बल पाच तास चर्चा झाली.

### पिंपरी-भोसरीत AQI 421 ते 427; घातक हवेचा इशारा

पिंपरी(दैनिक संध्या) : भोसरी भागातील हवा गत 24 ते 48 तासांपासून घातक या गटांत गेली आहे. इतकी खराब हवा दिल्ली येथे गणली जात आहे. शनिवारी आणि रविवारी भोसरी भागातील हवेचा निर्देशांक तब्बल 421 ते 427 इतका गणला गेला. तसेच, शहरातील बहुतांश भाग हे गंभीर ते खराब गटांत वारंवार जात आहेत. शहरातील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस खराब ते अतिखराब गटात जात आहे. गत चोवीस तासांत भोसरी येथील हवेची गुणवत्ता 421 ते 427 मायक्रो ग्राम प्रति.चौ.मी. इतकी गणली गेली. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानांकनाप्रमाणे ही गुणवत्ता घातक गटात आहे. तसेच, शहरातील शिवाजीनगर, निगडी, मुंढवा, केशवनगर, पिंपरी-चिंचवडसह बहुतांश भागांतील भागांची हवा गंभीर गटांत गणली जात आहे. शहराचे क्षेत्रफळ मुंबईपेक्षा जास्त असून 500 चौ.मी पेक्षा जास्त विस्तार झाला आहे. लोकसंख्येत मोठी वाढ होत असताना दुप्पट ते तिप्पट संख्येने वाहने वाढत आहे. वाहन इंधनाच्या प्रदूषणासह शहरात धुळीचे कण मोठ्या प्रमाणावर हवेत उत्सर्जित होत आहेत. याला बांधकामाची धूळ देखील तेवढीच जबाबदार आहे. शहरातील हवेची गुणवत्ता दिवाळीनंतर पाऊस थांबताच खराब गटांत जाते.

---

### लोककवी प्रा. प्रशांत मोरे यांच्या हृदयस्पर्शी काव्यसादरीकरणाने

# छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वाला भावनिक पूर्णविराम



'छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६' अंतर्गत आयोजित या समारोपीय कार्यक्रमाने नागरिकांना छत्रपतींच्या विचारांचा वारसा जपत सामाजिक बांधिलकी आणि संस्कारांची जाणीव करून दिली.

**पिंपरी (दै. संध्या) :**

राजमाता जिजाऊंच्या अंगाईतून स्वराज्याची बीजं रुजवणाऱ्या छत्रपती शिवबांचा इतिहास जेव्हा कवितेच्या शब्दांतून जिवंत होतो, तेव्हा मातृत्व, संस्कार आणि राष्ट्रनिर्मिती यांचा अद्वितीय संगम अनुभवायला मिळतो. समई आणि वात जशी अंधार चिरून प्रकाशाची दिशा दाखवतात, तशीच जिजाऊंच्या संस्कारांची ज्योत आणि शिवबांच्या कर्तृत्वाची कहाणी आपल्या सशक्त शब्दांतून उलगडत लोककवी प्रा. प्रशांत मोरे यांनी 'आई' या विषयावरील आपल्या कवितांच्या सादरीकरणातून स्वराज्याच्या जडणघडणीतील मातृत्वाची भूमिका प्रभावीपणे अनुभवायला लावली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या महान कार्याचा व व्यापक विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने १५ ते २१ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत शहरातील विविध ठिकाणी 'छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६' अंतर्गत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा समारोप लोककवी प्रा. प्रशांत मोरे यांच्या कवितांद्वारे चिंचवड येथील संभाजीनगर येथे पार पडला. या कार्यक्रमास नगरसदस्या अनुराधा गोरखे, तुषार हिंगे, कुशाग्र कदम, माजी महापौर मंगला कदम तसेच महापालिका उपायुक्त अण्णा बोदडे, साई किरण मित्र मंडळाचे अध्यक्ष विशाल नारखेडे, उपाध्यक्ष अजित कोडलकर, गिरीश तेलंग, कार्याध्यक्ष संजय कलागते, खजिनदार निलेश नारखेडे, सहखजिनदार मंगेश गुंजाळ आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी साई किरण मित्र मंडळाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी लोककवी प्रा. प्रशांत मोरे यांनी "हंबरून वासराले चाटती जवा गाय, तवा मले तिच्यामंदी दिसती माझी माय.." ही प्रा. स. ग. पाचपोळ यांची कविता स्वतः सुरबद्ध केलेल्या चालीमध्ये सादर करत उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर आईच्या त्याग, माया, संघर्ष आणि प्रेम यांचे विविध पैलू उलगडणाऱ्या कविता सादर करत त्यांनी उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला. माय तान्ह्या लेकराला, सत्य सांगे जिजाबाई, देवा शिवबा नावाची, जन्मा आली हो नवलाई..., तुझ्यामुळे या जन्माला खरा अर्थ मिळाला, नाहीतर माझा श्वासही व्यर्थच राहिला..., जात्यामध्ये धान्य नाही तरीही माय ओढायची, डोळ्यामध्ये पाणी नाही तरी माय रडायची..., मायेले बाप म्हणलो, बापाले माय म्हणालो..., बाप शिवाराचा धनी, माय शिवाराची राणी..., बाप बाभळीचा काटा ऊन पिऊन जगतो, माय पारंब्या पारंब्या पसारा भुईत.., अशा अनेक भावस्पर्शी ओळींमधून आईचे कष्ट, त्याग आणि निस्सीम प्रेम यांचे जिवंत चित्रण करत कवी प्रशांत मोरे यांनी उपस्थितांना भावनिक केले. या काव्यसादरीकरणाद्वारे मातृत्वाची ताकद आणि संस्कारांची भूमिका अधोरेखित करत लेकराच्या जडणघडणीत आईचे स्थान किती महत्त्वाचे आहे, हा विचार प्रभावीपणे मांडण्यात आला.

---

## डांगे चौकात खुलेआम जुगार अड्डा

### पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह





**पिंपरी (दै. संध्या) :**

थेरगाव परिसरातील डांगे चौकात भरदिवसा खुलेआम जुगार अड्डा सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. डांगे चौकातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराशेजारी असलेल्या फुटपाथवर काही व्यक्ती राजरोसपणे जुगार खेळताना दिसत आहेत. डांगे चौक हा शहरातील अतिशय वर्दळीचा भाग असून येथे नागरिकांची सतत ये-जा असते. अशा ठिकाणी दिवसाढवळ्या जुगार खेळला जात असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. संबंधित प्रकारामुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या ठिकाणी नियमितपणे जुगार खेळला जात आहे. यामुळे तरुणांवर वाईट परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या प्रकाराबाबत पोलिस प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे. भर चौकात उघडपणे सुरू असलेल्या या बेकायदेशीर प्रकाराकडे पोलीस नेमके काय करीत आहेत, असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान, पोलिसांकडून कारवाई होणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

---

## स्वच्छतेसाठी महापौर रवि लांडगे यांचा प्रत्यक्ष सहभागातून पुढाकार

### प्रदूषणास कारणीभूत कंपन्या व संस्थांवर कडक कारवाईचे दिले संकेत



**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतून इंद्रायणी नदीत प्रदूषण करणाऱ्या संबंधित कंपन्या व संस्थांवर प्रशासनामार्फत कडक कारवाई करण्यात येणार असून पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही. इंद्रायणी नदी स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांनीही सामूहिक जबाबदारी स्वीकारून पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे मत महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे,आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, यांच्या उपस्थितीत सात मावळे संवर्धन संस्थेमार्फत इंद्रायणी नदी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाचा मुख्य उद्देश इंद्रायणी नदीतील वाढत्या प्रदूषणाच्या समस्येकडे लक्ष वेधणे तसेच नदी स्वच्छतेसाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा होता.

या स्वच्छता मोहिमेदरम्यान महापौर लांडगे यांनी स्वतः इंद्रायणी नदीच्या पात्रात उतरून स्वच्छता उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. प्रत्यक्ष पाहणी करताना नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर साचलेला कचरा, औद्योगिक सांडपाणी, प्लास्टिक कचरा तसेच इतर घातक घटकांची त्यांनी पाहणी करून नदीच्या प्रदूषणामागील संभाव्य कारणांचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

या पाहणीनंतर महापौर लांडगे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतून इंद्रायणी नदीत सोडण्यात येणारे प्रदूषित सांडपाणी, औद्योगिक कचरा आणि पर्यावरणास हानिकारक घटक यांस जबाबदार असलेल्या संबंधित कंपन्या तसेच इतर संस्थांवर प्रशासनामार्फत कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत दिले.

इंद्रायणी नदीचे पावित्र्य आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी प्रशासन, सामाजिक संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. याशिवाय या स्वच्छता अभियानामुळे नदी संवर्धनाच्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलले गेले असून भविष्यात अशा मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचेही प्रशासनातर्फे सांगण्यात आले. या उपक्रमात सात मावळे संवर्धन संस्थेचे पदाधिकारी, स्थानिक नागरिक तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. इंद्रायणी नदी स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त करण्यासाठी अशा लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या मोहिमांना भविष्यात अधिक गती तसेच प्रोत्साहन दिले जाईल असे देखील महापौर लांडगे यांनी यावेळी सांगितले.

---

## सुसंवाद हा 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वाचा मूलमंत्र – डॉ. संजय उपाध्ये



**पिंपरी (दै. संध्या) :**

'सुसंवाद हा 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वाचा मूलमंत्र आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ निरूपणकार डॉ. संजय उपाध्ये यांनी काशीधाम मंगल कार्यालय, चिंचवडगाव येथे रविवार, दि.२२ रोजी केले. गांधी पेठ तालीम मित्रमंडळ आयोजित 'मन करा रे प्रसन्न!' या मासिक प्रवचनमालिकेतील अमृतमहोत्सवी ७५ वे प्रवचनपुष्प गुंफताना 'विचार करूनच बोला!' या विषयावर डॉ. संजय उपाध्ये यांनी निरूपण केले.

याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसेवक राहुल कलाटे, शेखर चिंचवडे, नगरसेविका मनीषा चिंचवडे आणि गांधी पेठ तालीम मित्रमंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ गोलांडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती; तर विविध क्षेत्रांतील मान्यवरांची सभागृहात उपस्थिती होती. खासदार श्रीरंग बारणे यांनी 'विविध विषयांवर सलग पंचाहत्तर मासिक प्रवचनांतून डॉ. संजय उपाध्ये यांनी हिंदुत्वाची चळवळ सक्षम केली असून आता तरुणांनी या समाजप्रबोधनाच्या प्रवाहात सामील व्हावे!' असे आवाहन केले. आमदार शंकर जगताप यांनी, 'स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव काळात प्रवचनांचा अमृतमहोत्सव ही कौतुकास्पद बाब आहे!' असे गौरवोद्गार काढले. महापौर रवी लांडगे यांनी, 'कला, साहित्य, संस्कृती याविषयीचे ज्ञान प्रवचनातून प्राप्त होते!' असे विचार व्यक्त केले. राजाभाऊ गोलांडे यांनी प्रास्ताविकातून, 'डॉ. संजय उपाध्ये यांनी 'मन करा रे प्रसन्न!' प्रवचनमालिकेतून केलेले प्रबोधन पंतप्रधान यांच्या 'मन की बात'ची आठवण करून देणारे आहे!' असे मत व्यक्त केले. डॉ. संजय उपाध्ये पुढे म्हणाले की, 'सद्गुणाचा अतिरेक ही देखील विकृती आहे. सर्वधर्मसमभाव किंवा धर्मनिरपेक्षता या गोष्टींच्या अतिरेकामुळे हिंदू समाज आपले अस्तित्व हरवत चालला आहे. त्यासाठी हिंदू समाजाला एकत्र येण्याची सवय लावली पाहिजे. त्यामुळे हिंदूंनी जातिभेदासह सर्व भेदाभेद दूर सारून आपापसात सुसंवाद साधला पाहिजे. अर्थातच व्यक्ती, कुटुंब, समाज आणि राष्ट्र या परिघात संवादाची व्याप्ती वाढली पाहिजे. त्यासाठी आधी स्वतःशी मग कुटुंब, समाज आणि राष्ट्राशी संवाद साधा. संवादात विचार करूनच बोलले पाहिजे; कारण एकदा तोंडातून बाहेर पडलेला शब्द परत घेता येत नाही.

---

## लोणावळ्यात भांगरवाडी रेल्वे उड्डाणपूल रखडला; नागरिक त्रस्त

**लोणावळा (दै. संध्या) :**

लोणावळा शहरातील बहुचर्चित व बहुप्रतिक्षित भांगरवाडी रेल्वे उड्डाणपूल होणार तरी केव्हा? असा प्रश्न हजारो लोणावळकर नागरिक दररोज उपस्थित करत आहेत. त्याचे कारण म्हणजे भांगरवाडी रेल्वे गेटच्या समस्या. मागील काही काळापासून भांगरवाडी रेल्वे गेट नागरिकांसाठी खोळंबा झाला आहे. सकाळ, दुपार, संध्याकाळ किंवा अगदी रात्री जरी गेले तरी हा रेल्वे गेट कायम बंद असतो. रेल्वे गेट एकदा बंद झाला की किमान 20 ते 35 मिनिटे तो उघडत नाही. त्यामुळे दररोज हजारो नागरिकांना या रेल्वे गेटचा त्रास सहन करावा लागतो आहे. वारंवार सूचना करून व मागणी करूनदेखील रेल्वे गेट तत्काळ उघडले जात नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत. कोविडपूर्वी हा रेल्वे गेट रेल्वे पास झाल्यानंतर काही क्षणासाठी उघडला जायचा, तेवढ्या वेळात गेटच्या दुतर्फा असलेली वाहने लगेच निघून जात असत. आता मात्र तीन ते चार गाड्या पास झाल्याशिवाय गेट उघडत नाहीत. त्यामध्ये किमान एक ते दोन मालगाड्या असतात. त्यामुळे एकदा गेट बंद झाला की तो थेट अर्ध्या तासाने उघडले जाते. या रेल्वे गेटच्या समस्या सोडवण्यासाठी लोणावळा नगर परिषदेने भांगरवाडी ते नांगरगाव दरम्यान रेल्वे उड्डाणपूल बांधण्याचा निर्णय 2005 साली घेतला होता.

---

# पीसीसीओईने विकसित केलेले ड्रोन तंत्रज्ञान आपत्तीच्या काळात उपयोगी

### विठ्ठल काळभोर : "निडर २०२६" स्पर्धेत पीसीसीओईच्या आपत्ती व्यवस्थापन ड्रोनला रौप्यपदक




**पिंपरी (दै. संध्या) :**

नॅशनल इनोव्हेशन चॅलेंज फॉर ड्रोन ॲप्लीकेशन अँड रिसर्च (निडर २०२५-२६) या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये पीसीसीओई महाविद्यालयाने "आपत्ती व्यवस्थापन" विभागात सादर केलेला ड्रोन प्रकल्प सर्व तांत्रिक अटी, शर्ती पूर्ण करून रौप्यपदक आणि चार लाख रुपयांच्या बक्षीसाचा मानकरी ठरला. आपत्ती व्यवस्थापनात आणीबाणीच्या प्रसंगी उद्भवणाऱ्या परिस्थितीत बचाव कार्य करण्यासाठी पीसीसीओईने पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञान वापरून विकसित केलेले हे ड्रोन उपयोगी ठरेल असे प्रतिपादन पीसीईटीचे सचिव विठ्ठल काळभोर यांनी केले. नवी दिल्ली, ग्रेटर नोएडा येथील गौतम बुद्ध विद्यापीठ येथे आयोजित केलेल्या नॅशनल इनोव्हेशन चॅलेंज फॉर ड्रोन ॲप्लिकेशन अँड रिसर्च (NIDAR) या स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (पीसीसीओई) रौप्य पदक विजेत्या "टीम मॅव्हरिक इंडिया" आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांचा सत्कार पीसीईटीचे सचिव विठ्ठल काळभोर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओई संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, डीन आर अँड डी डॉ. नरेंद्र देवरे, विभाग प्रमुख डॉ. पद्माकर देशमुख, प्रा. अमित पंचवाडकर, चंदन इंगोले, प्रा. अजय गाडे आणि टीम मधील यशस्वी विद्यार्थी उपस्थित होते.

या स्पर्धेत भारतातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयामधील ३५१ विद्यार्थी संघांनी सहभाग घेतला होता. पीसीसीओई संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सांगितले कि, पीसीसीओई टीम मॅव्हरिक इंडिया मधील ऋतिक लीपाटे आणि निमिषा खलाबे यांच्या नेतृत्वाखालील टीमने आपत्ती व्यवस्थापनात आणीबाणीच्या प्रसंगी उद्भवणाऱ्या परिस्थितीत बचाव कार्य करण्यासाठी पूर्णपणे स्वदेशी, फील्ड - डिप्लोएबल, स्वायत्त हवाई प्रणाली वापरून सादर केलेला ड्रोन स्पर्धेत आकर्षण ठरला. या ड्रोन मध्ये आपत्तीग्रस्त काळात उद्भवलेल्या परिस्थितीवर पाळत ठेवणे आणि वाचलेल्यांना शोधण्यासाठी, ३-मीटर व्हीटीओएल आणि अचूक वैद्यकीय किट वितरणासाठी हेक्साकॉप्टर यांचा समावेश आहे. ही प्रणाली थर्मल इमेजिंग, ऑनबोर्ड मशीन लर्निंग, रिअल टाइम जीपीएस समन्वय आणि थेट व्हिडिओ स्ट्रीमिंग एकत्रित करते, त्यामुळे अचूकपणे नियोजन करून निर्णय घेता येतात. यामुळे जीवित, वित्तीय हानी टाळता येईल आणि परिस्थितीवर नियंत्रण मिळवता येईल.

या प्रकल्प प्रणालीसाठी महाराष्ट्र फास्टनर्स प्रा. लि., डसॉल्ट सिस्टम्स, एएनएसवायएस, कार्बोनेक्स्ट इंडिया प्रा. लि., डीआरके स्टोअर, एम पॉवर लिथियम, एमएडी कंपोनेंट्स, ट्रेड सिंडिकेट, रॅपिड प्रिंट्स आणि विराग इंडस्ट्रीज प्रा. लि. कंपन्यांनी सहकार्य केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## विमान अपघात निधनाची चौकशी व्हावी यासाठी ग्रामस्थांच्यावतीने कडकडीत बंद

बारामती (दैनिक संध्या) : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा गेल्या महिन्यात विमान अपघातात मृत्यू झाला आहे.सदर विमान अपघात हा नैसर्गिकरीत्या झाला नसून घातपाताची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहे केंद्र व राज्य शासनाकडून या संशयित विमान अपघाताचा तपास वेळेवर केला जात नसल्याची तक्रार केली जात आहे. मात्र त्याची दखल घेत नसल्याने संपूर्ण महाराष्ट्र सह बारामती तालुक्यात त्याचे तीव्र पडसाद उमटले असून या प्रकरणाची निपक्षपातीपणे व जलद गतीने चौकशी व्हावी, यासाठी आज डोर्लेवाडी येथे निषेध सभा व बंद पुकारण्यात आला.त्यास ग्रामस्थांनी उस्फूर्तपणे सहभाग दाखवला. डोर्लेवाडी ग्रामपंचायत कार्यालयासमोर झालेल्या निषेध सभेत गावातील अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले व तपास योग्य रीतीने व्हावा यासाठी शासनास निवेदन तयार करण्यात आले होते.त्या निवेदनाची प्रत बारामती शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले.जर योग्य पद्धतीने तपास झाला नाही तर मोठे आंदोलन उभे करण्याचा निर्णय यावेळी समस्त ग्रामस्थांच्या वतीने घेण्यात आला.यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच सदस्य तसेच गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संत गाडगे बाबा यांना जयंती निमित्त भिवंडी महानगरपालिकेतर्फे अभिवादन

भिवंडी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकान्वये  रोजी संत गाडगे बाबा यांच्या जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर नवनिर्वाचित महापौर नारायण रतन चौधरी यांच्या शुभहस्ते आयुक्त  अनमोल सागर व मा. उप-महापौर  मोमीन अब्दुल तारिक बारी यांच्या उपस्थितीत संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी, अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, अतिरीक्त आयुक्त  नयना ससाणे, उप-आयुक्त (मुख्यालय) विक्रम दराडे, मा. उप-आयुक्त (कर) बाळकृष्ण क्षिरसागर, शहर अभियंता श्री. जमिल पटेल, अति.शहर अभियंता सचिन नाईक,  कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा  संदिप पटणावर, सहा. आयुक्त (निवडणुक) नितीन पाटील, करमुल्यांकन अधिकारी सुधीर गुरव, उद्यान अधिक्षक निलेश संखे, शहर विकास विभाग प्रमुख अरविंद घुगरे व अधिकारी,कर्मचारी वर्ग मोठया संख्येने उपस्थित होते.


# कुऱ्हाडीने हल्ला झालेल्या जखमी जिवासाठी धडपडणारे पोलीस

**जलद कारवाई करत जखमीचा जीव वाचवून दोन आरोपी अटकेत : बारामती शहर पोलीस स्टेशनची धडाकेबाज कामगिरी**

बारामती (दै. संध्या)

बारामती शहर पोलीस स्टेशन मध्ये फिर्यादी महेंद्र धोंडिबा गायकवाड,वय 53 वर्षे,व्यवसाय – स्वप्नील हॉटेल, रा. खांडज, 22 फाटा, ता. बारामती, जि. पुणे यांच्या फिर्यादीवरून गंभीर गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

दिनांक 22/02/2026 रोजी दुपारी मोरगाव रोडवरील ग्लोबल हॉटेल समोर,प्रणव डिजीटल दुकानाजवळील मैदानात, दिनांक 21/02/2026 रोजी रात्री हॉटेलच्या बिलावरून झालेल्या वादाचा राग मनात धरून, अक्षय जगताप व त्याच्या सोबत्यांनी फिर्यादीवर जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने लाकडी दांड्याच्या कु-हाडीने व लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला करून उजव्या पायावर व छातीत गंभीर



दुखापती केल्या. हल्ल्यावेळी एका साथीदाराने आसपासच्या नागरिकांना “कोणी मध्ये येऊ नका, नाहीतर बघून घेऊ” अशी धमकी देऊन धाकदपटशा केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी,बारामती यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व जखमी व्यक्तीस वेळ न दवडता उपलब्ध वाहनाद्वारे मेडिकल कॉलेज,बारामती येथे दाखल करून तातडीने उपचार सुरू करण्यात आले.  डॉक्टरांच्या त्वरित उपचारांमुळे व पोलीस दलाच्या जलद निर्णयक्षमतेमुळे जखमीचा जीव वाचला असून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस यंत्रणा सदैव जागरूक व कटिबद्ध असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. या गंभीर गुन्ह्यानंतर बारामती शहर पोलीसांनी अल्पावधीतच तपासाची चक्रे वेगाने फिरवून गुन्ह्यातील संशयित आरोपी 1) विक्रम जगताप, रा. खांडज, ता. बारामती, जि. पुणे व 2) जयदीप भागवत भोसले, रा.पाहुणेवाडी,ता.बारामती, जि.पुणे यांना ताब्यात घेतले असून त्यांच्या विरोधात कठोर कारवाई सुरू आहे.  मुख्य आरोपी अक्षय सुनिल जगताप (रा.माळेगाव कारखाना,ता. बारामती) व त्याचा साथीदार महादेव उर्फ भाऊ सुरेश जाधव(रा. ढवळेमळा) हे सध्या फरार असून,त्यांना अटक करण्यासाठी विशेष तपास पथक नेमून तांत्रिक व गुप्त माहितीच्या आधारे त्यांचा शोध तीव्र करण्यात आला आहे.

सदर आरोपींना शोधून काढणे व ताब्यात आणण्याकरिता तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. सतीश राऊत,पोलीस हवालदार श्री सुलतान डांगे,पोलीस हवालदार अमोल शिंदे, पोलीस शिपाई गिरीश नेवसे,पोलीस शिपाई वैभव मदने,पोलीस शिपाई राहुल बडे व पोलीस शिपाई रईस मुलानी यांनी अत्यंत मोलाची व परिश्रमपूर्वक कामगिरी बजावली आहे. या पथकाने रात्री-दिवस कष्ट घेऊन पुरावे गोळा करणे,संशयितांचा माग काढणे व त्यांना ताब्यात घेणे यामध्ये महत्त्वाची भूमिका निभावली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री.संदीपसिंग गिल,अप्पर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.श्री. सुदर्शन राठोड व प्रभारी पोलीस निरीक्षक श्री.श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री.भंडारे व तपास पथकाकडून करण्यात येत आहे.

> बारामती पोलीस नागरिकांना आवाहन करतात की,सदर फरार आरोपींबाबत कोणतीही खात्रीशीर माहिती असल्यास ती जवळच्या पोलीस स्टेशनला किंवा पोलीस हेल्पलाईनवर कळवावी,माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल आणि कायदा स्वतःच्या हाती न घेता पोलीस यंत्रणेला सहकार्य करावे.
>
> **- प्रभारी पोलिस निरीक्षक, बारामती शहर पोलीस स्टेशन**



## मल्हार जलाशयावर स्वच्छता मोहीम

जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी नगरपरिषद व संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मल्हार जलाशय येथे स्वच्छता मोहीम उत्साहात राबविण्यात आली. पर्यावरण संवर्धन व जलसंपत्ती संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मोहिमेचे उद्‌घाटन जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई, उपनगराध्यक्ष  गणेश निकुडे पाटील, मुख्याधिकारी  चारुदत्त इंगुले तसेच फाउंडेशनच्या संचालिका  भारती घोरपडे  यांच्या उपस्थितीत झाले. मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली जलाशय परिसरातील कचरा संकलन, प्लास्टिक निर्मूलन व संपूर्ण परिसर स्वच्छता करण्यात आली.

नगरपरिषद कर्मचारी, स्वयंसेवक व स्थानिक नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून “स्वच्छ परिसर, सुरक्षित जलसाठा” हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून साकार केला. या मोहिमेद्वारे जलप्रदूषण रोखणे, पर्यावरण संवर्धन करणे आणि सार्वजनिक आरोग्याबाबत जनजागृती करणे हा उद्देश साध्य करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन जेजुरी नगर परिषदेचे शहर समन्वयक  सुदर्शन काळेल यांनी केले. स्वच्छतेसाठी नागरिकांनी नियमित सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# दीपाली निकम यांची कृषी अधिकारीपदी निवड

### ग्रामीण शिवारातून राज्य सेवेकडे वाटचाल



डोर्लेवाडी (दै. संध्या)

झारगडवाडी (ता. बारामती) येथील दीपाली विजयकुमार निकम हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या कृषी सेवा स्पर्धा परीक्षेत राज्यात ४९ वा क्रमांक मिळवत कृषी अधिकारी पदावर निवड झाली आहे. तिच्या या यशामुळे झारगडवाडी गावासह बारामती तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.आयोगाने नुकत्याच जाहीर केलेल्या अंतिम निकालात दीपालीने पहिल्याच प्रयत्नात पूर्व परीक्षा,मुख्य परीक्षा आणि मुलाखत हे तिन्ही टप्पे यशस्वीरीत्या पार केले.विशेष म्हणजे कोणत्याही खासगी क्लासचा आधार न घेता तिने केवळ स्वअभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले.तयारीच्या काळात दररोज १० ते १२ तासांचा अभ्यास,नियोजनबद्ध वेळापत्रक आणि सातत्यपूर्ण मेहनत हे तिच्या यशाचे प्रमुख घटक ठरले.

दीपालीचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, झारगडवाडी येथे झाले. त्यानंतर एम. एस. सो. विद्यालय,बारामती येथे माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुढे विद्या प्रतिष्ठानच्या महाविद्यालयातून बारावी शिक्षण घेतल्यानंतर तिने डॉ. शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालय, बारामती येथून पदवीचे शिक्षण पूर्ण केले.पदव्युत्तर शिक्षणासाठी तिने महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी येथे वनस्पती रोगशास्त्र या विषयात पदव्युत्तर पदवी संपादन केली.

तिचे वडील विजयकुमार निकम हे शेतकरी असून आई गृहिणी आहेत. लहानपणापासूनच प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न दीपालीने जोपासले होते. कुटुंबीयांचे प्रोत्साहन आणि स्वतःची जिद्द यांच्या बळावर तिने हे ध्येय गाठले. ग्रामीण पार्श्वभूमीवरून येत स्पर्धा परीक्षेत यश मिळवणे हे अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.तिच्या यशाबद्दल झारगडवाडी येथील नागरिकांनी तिचा सत्कार करून अभिनंदनाचा वर्षाव केला. ग्रामस्थांनी फटाक्यांची आतषबाजी करत आनंद साजरा केला.

**शेतकऱ्यांसाठी काम करण्याची बांधिलकी**

> “मी याच शिवारात वाढले. शेतकऱ्यांचे कष्ट मी जवळून पाहिले आहेत. त्यामुळे कृषी अधिकारी म्हणून काम करताना माझे पहिले प्राधान्य आपल्या मातीला आणि शेतकऱ्याला असेल. शासनाच्या विविध कृषी योजना खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन,” अशी भावना दीपाली निकम हिने व्यक्त केली.



## राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती गाडगे महाराज शिक्षण संकुलात संपन्न

ओतूर (दै. संध्या)

राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची १५० वी जयंती गाडगे महाराज शिक्षण संकुलामध्ये संपन्न करण्यात आली अशी माहिती गाडगे महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने यांनी दिली. ह भ प सर्जेराव महाराज गाढवे आपल्या मनोगत म्हणाले,गाडगे बाबांच्या विचारांचा जागर होणे ही काळाची गरज आहे. तिर्थी धोंडा पाणी,देव रोकडा सज्जनी. मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा गाडगेबाबांच्या दश सूत्री जनमाणसांमध्ये यावी. तहानलेल्यांना पाणी, अंध पंगुंना औषधोपचार, निराधारांना आधार ही काळाची गरज आहे असे त्यांनी नमूद केले. मीरा शिंदे यांनी गाडगे बाबांचे कार्य गीतामधून सादर केले. राजू ठोकळे यांनी आपल्या मनोगतामध्ये गाडगे महाराज यांचे वैचारिक संबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, प्र के अत्रे यांच्या बरोबर वैचारिक बैठक होती अज्ञान अंधश्रद्धा यात बुडालेल्या समाजाला विज्ञान आणि शिक्षणाच्या माध्यमातून सावरण्याचे काम संत गाडगे महाराज यांनी केले. गाडगे महाराजांचे विचार स्वातंत्र्यपूर्व काळ व स्वातंत्र्य उत्तर काळात शिक्षणाचे असलेली अनन्य साधारण महत्व त्याचबरोबर वस्तीगृहांची निर्मिती व शिक्षणाची गंगा प्रत्येक दीनदलित समाजा पर्यंत जावी, क्रांती घडावी यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत आणि खऱ्या अर्थाने हीच खरी जयंती व पुण्यतिथी होऊ शकते असे प्रतिपादित केले. शिक्षक प्रतिनिधी मनीषा पाटील यांनी आपल्या मनोगतामध्ये स्वच्छतेचे महत्व सांगितले. गाडगे महाराजांचा जन्म अतिशय गरीब कुटुंबात २३ फेब्रुवारी १८७६ मध्ये शेंडगाव तालुका दर्यापूर जिल्हा अमरावती या ठिकाणी झाला तत्कालीन परिस्थिती अतिशय भयानक असतानाही गाडगेबाबांनी आपल्या विचारांचा प्रभाव पाडला. सामाजिक कार्यकर्ते वसंत आप्पा डुंबरे पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. हरीश पटेल.शंकर पटेल, सर्जेराव महाराज गाढवे यांनी सर्व मुलांना मिष्ठान दिले.

यावेळी विचार मंचावर ह भ प सर्जेराव महाराज गाढवे, हरी पटेल, पांडुरंग ढोबळे, बबन तांबे, वसंत डुंबरे, दत्तात्रय डुंबरे शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य नितीन पाटील, अरुण वाकचौरे गाडगे महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने, माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक बाबुलाल थोरात, प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका सुमन घाडगे, शिक्षक प्रतिनिधी मनीषा ठाकरे,पर्यवेक्षक कैलास महाजन, रामदास बगाड,धीरज कुमार सोनवणे,अशोक पाटील, सुनील खूपसे,प्रकाश मोधे, ज्येष्ठ शिक्षक प्रदीप कुमार मिरगे व इतर मान्यवर उपस्थित होते.

## बारामतीमध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी पदास राज्य सरकारची मंजुरी

बारामती (दै. संध्या)

■ प्रशासकीय, महसुल विषयक कामांना मिळणार वेग



पुणे जिल्ह्यात वाढत चाललेल्या प्रशासकीय कामकाजाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य सरकारने बारामती येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी पद निर्माण करण्यास मंजुरी दिली आहे.या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे बारामती तालुक्यासह इतर गावांतील महसुल विषयक व इतर प्रशासकीय कामांना  गती मिळेल अशी अपेक्षा सर्वांकडून व्यक्त होत आहे.पुणे जिल्ह्याची वाढलेली लोकसंख्या, औद्योगिक विस्तार व बारामतीतील विविध विकास कामाचा व्याप लक्षणीय वाढलेला आहे.बारामती,इंदापूर,दौंड,पुरंदर या तालुक्यांमध्ये प्रशासकीय प्रकरणांची संख्या वाढत असल्याने स्थानिक पातळीवर म्हणजेच बारामतीत स्वतंत्र अतिरिक्त जिल्हाधिकारी नेमणूक करण्याची मागणी केली जात असल्याने त्याचा शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. अखेर राज्य सरकारने या प्रस्तावाला मंजुरी देत बारामती येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी पदास हिरवा कंदील दिला आहे. या नव्या कार्यालयामुळे महसुलविषयक कामे, जमीनीविषयक कामे, अपील प्रकरणे,निवडणूक प्रक्रिया आणि इतर शासकीय कार्यवाही प्रकरणे अधिक वेगाने पार पाडता येणार आहे. नागरिकांना प्रशासकीय कामांसाठी जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे येथे जाण्याची गरज कमी होणार आहे.पुणे जिल्ह्यात दोन ठिकाणी अतिरिक्त जिल्हाधिकारी पदे निर्माण करण्याचा विचार होता. मात्र सध्या बारामतीलाच मंजुरी मिळाली आहे.या निर्णयामुळे बारामतीच्या प्रशासकीय कामकाजाच्या महत्त्वात वाढ झाली असून स्थानिक स्तरावर समाधान व्यक्त होत आहे.या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे लवकरच या पदाची अधिकृत नियुक्ती होणार आहे व त्यानंतर प्रशासकीय कार्यालयीन कामकाजास औपचारिक सुरुवात होणार आहे.

## संत निरंकारी मिशनच्या वतीने आळंदीत विशाल स्वच्छता अभियान

आळंदी (दै. संध्या)

सेवा हीच साधना आणि निसर्गसंवर्धन हे जीवनमूल्य ठरवत संत निरंकारी मिशनच्या वतीने ‘प्रोजेक्ट अमृत’ अंतर्गत ‘स्वच्छ जल, स्वच्छ मन’ या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे आयोजन रविवारी सकाळी ८ ते ११ दरम्यान देशभर एकाच वेळी करण्यात आले. परम श्रद्धेय सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज एवं निरंकारी राजपिता जी यांच्या पावन मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. पुणे शहरासह जिल्ह्यातील विविध भागांत मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविण्यात आला. या मोहिमेअंतर्गत पुणे जिल्ह्यातील आळंदी येथील इंद्रायणी नदी घाट परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे, गोविंद कुऱ्हाडे, दिनेश घुले, सचिन गिलबिले, सागर कुऱ्हाडे यांच्यासह मिशनचे सेवादार मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत निरंकारी मंडळाचे नंदकुमार झांबरे यांनी माहिती देताना सांगितले की, देशभरातील सुमारे १६०० हून अधिक ठिकाणी आणि पुण्यात ४२ ठिकाणी हा उपक्रम एकाच वेळी पार पडला. पाणी हे केवळ नैसर्गिक साधन नसून जीवनाचा मूलाधार व ईश्वराची अमूल्य देणगी आहे.

# महामानवांचा आगळावेगळा संयुक्त जयंती सोहळा उत्साहात संपन्न

नांदेड (दै. संध्या)

सूर्यमुद्रा फाऊंडेशन नांदेड च्या वतीने प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे ऊर्जाकेंद्र माता भीमाई आणि हिमालयाची सावली त्यागमूर्ती माता रमाई आणि राष्ट्रसंत रविदास महाराज ह्यांचा संयुक्त जयंती सोहळा अमृत विद्यार्थी संस्कार केंद्र, श्रावस्तीनगर नांदेड येथे उत्साहात संपन्न झाला.या सोहळ्या निमित्त भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डेप्युटी इंजि.भारत कुमार कानिंदे हे होते.प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महापुरुष आणि महामाता यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.यावेळी सर्व मान्यवरांना ग्रंथ आणि पुष्पगुच्छ हर्षवर्धन सोनकांबळे,अनिल सोनकांबळे,शंकर गायकवाड आदी पदाधिकाऱ्यांनी देवून त्यांचे स्वागत केले.त्यानंतर या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आणि सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.विलासराज भद्रे यांनी प्रास्ताविक करून सोहळ्याच्या प्रथम सत्रात महासुर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आई माता भीमाई ह्यांच्या जीवन कार्यावर भारतीय बौद्ध महासभा नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष आयु.गणपत गायकवाड यांनी प्रभावी शब्दांत प्रकाश टाकला.त्यानंतर सुप्रसिद्ध लेखिका विचारवंत डॉ. निर्मला भामोदे (अकोला) ह्यांनी आपल्या ओघवत्या शैलीत राष्ट्रसंत रविदास महाराज यांच्या पुरोगामी विचारांचे बंडखोर साहित्य आणि जीवन संघर्षाचे चित्रण केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हिमालया समान कार्याला आपली खंबीर साथ देणाऱ्या माता रमाई यांच्या त्याग, प्रखर झुंज आणि समर्पण यांचे भावस्पर्शी चित्रण प्रज्ञासूर्य समता परिषद प्रवक्त्या आणि युवा वक्ता आरती कांबळे यांनी केले. या तिन्ही व्याख्यानामुळे रसिक मंत्रमुग्ध झाले.द्वितीय सत्रात अखिल भारतीय संत रविदास साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ख्यातनाम साहित्यिक, विचारवंत डॉ.निर्मलाताई भामोदे (अकोला) यांचा आणि " रायगडा कडून राजगृहाकडे " ह्या नाटकाला महाराष्ट्र शासनाचा राम गणेश गडकरी उत्कृष्ट वाड्मय पुरस्कार मिळाल्याबद्दल सुप्रसिद्ध लेखक,वक्ते आयु. गणपत गायकवाड यांचा विशेष सत्कार इंजी.भारतकुमार कानिंदे, डॉ.विलासराज भद्रे,आरती कांबळे यांच्या हस्ते करण्यात आला.संयुक्त जयंती सोहळ्याच्या तृतीय सत्रात अनेक पुरस्कार प्राप्त ख्यातनाम अभिनेते आणि विचारवंत प्रा. पुंडलिकराव भामोदे (अकोला) यांनी " मी ज्योतिराव फुले बोलतोय " ह्या एकपात्री नाटकातून आपल्या उत्कृष्ट लेखन आणि जिवंत अभिनयाने रसिकांची मने जिंकली. गोरगरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण,उत्तम संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास देणाऱ्या मराठवाड्यातील पहिल्या विद्यार्थी संस्कार केंद्राच्या गेल्या ३ वर्षातील दैदिप्यमान वाटचालीबद्दल सर्व मान्यवरांनी मुख्य संचालक डॉ. विलासराज भद्रे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मनस्वी कौतुक केले. आणि असंख्य संकटाशी संघर्ष करत नवीन पिढी घडविणाऱ्या ह्या स्वाभिमानी केंद्राला समाजाने उत्स्फूर्त मदत करावी असे प्रतिपादन केले.रसिकांच्या अप्रतिम प्रतिसादाने यशस्वी झालेल्या ह्या संयुक्त जयंती सोहळ्यास मोठ्या संख्येने महिला आणि विद्यार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या शेवटी मिठाई वाटप करून सोहळ्याचा गोड समारोप करून हा कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने यशस्वीरित्या संपन्न करण्यात आला.



# माझी वसुंधरा अभियानात पिंपरी चिंचवड महापालिका सलग तिसऱ्यांदा राज्यात अव्वल

**१० कोटीचे बक्षिस जाहिर**

**पिंपरी (दै. संध्या)**



पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि हरित उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 'माझी वसुंधरा अभियान ५.०' मध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावत सलग तिसऱ्यांदा अव्वल स्थान मिळविले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महापालिकेस १० कोटीचे बक्षिस जाहिर झाले असून आज राज्यस्तरीय आयोजीत सन्मान सोहळ्यात महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत व उप मुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते महापौर रवि लांडगे व आयुक्त श्रावण हर्डीकर यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज,महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते. १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व हवामान बदल विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ५.०' च्या राज्यस्तरीय अंतिम निकालात, १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या गटामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रथम क्रमांक मिळवित सलग तिसऱ्यांदा राज्यात अव्वल येण्याची किमया साधली.

'माझी वसुंधरा अभियान ५.०' अंतर्गत भूमी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचमहाभूतांवर आधारित विविध पर्यावरणीय निकषांवर शहरांची कामगिरी तपासण्यात आली. या निकषांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन, स्त्रोतस्थानी कचरा विलगीकरण, निर्माल्य पुनर्प्रक्रिया प्रकल्प, एकल-वापर प्लास्टिकमुक्त मोहीम, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, जलसंधारण उपक्रम, सौरऊर्जा वापर तसेच हरित पट्टा विस्तार या क्षेत्रांत प्रभावी अंमलबजावणी केली.

शहरातील पर्यावरणीय गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा घडवून आणताना प्रशासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आणि व्यापक जनसहभागाला विशेष प्राधान्य दिले.

सलग तिसऱ्यांदा राज्यात प्रथम क्रमांक मिळविणे ही पिंपरी चिंचवड शहराच्या शाश्वत, नियोजनबद्ध आणि पायाभूत पर्यावरणीय प्रगतीची ठोस साक्ष आहे. या यशामुळे शहर राज्यातील इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रेरणादायी ठरले असून, भविष्यात अधिक नाविन्यपूर्ण, तंत्रज्ञानाधारित आणि शाश्वत उपक्रम राबवून हरित, स्वच्छ व पर्यावरणपूरक शहर घडविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला आहे.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत सलग तिसऱ्यांदा राज्यात प्रथम क्रमांक मिळविणे हा संपूर्ण पिंपरी चिंचवडकरांसाठी अभिमानाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे. पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात शहराने सातत्यपूर्ण, नियोजनबद्ध आणि परिणामकारक कामगिरी करत राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. हे यश केवळ महापालिकेचे नसून शहरातील नगरसदस्य, नगरसदस्या, नागरिक, स्वयंसेवी संस्था, शाळा-महाविद्यालये, उद्योग क्षेत्र आणि सर्व घटकांच्या सक्रिय सहभागाचे फलित आहे.
>
> **– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> शाश्वत विकासाच्या दिशेने शहराची वाटचाल अधिक वेगाने सुरू आहे. तंत्रज्ञानाधारित व्यवस्थापन, पारदर्शक अंमलबजावणी आणि जनसहभाग यांच्या माध्यमातून आम्ही पर्यावरणीय निकषांमध्ये उल्लेखनीय सुधारणा साधली आहे. भविष्यातही हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक शहर उभारण्याचा आमचा निर्धार कायम राहील.
>
> **– श्रावण हर्डीकर, आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## थोडक्यात पण महत्वाचे...




### जागतिक कॅन्सर महिन्याच्या निमित्ताने सुरु केले 'झिरो टू हिरो' अभियान

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातील पहिले ४०० बेड्सची क्षमता असलेले 'क्वाटरनरी केअर सेंटर' असलेल्या अपोलो हॉस्पिटल्स पुणेतर्फे जागतिक कॅन्सर महिन्यानिमित्त 'झिरो टू हिरो' या जनजागृती मोहिमेचा शुभारंभ आज करण्यात आला. कॅन्सरचे अगदी पहिल्या टप्प्यात निदान झाल्यास रुग्णाचे प्राण वाचू शकतात, हा संदेश जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी ही मोहीम राबवली जात आहे. कॅन्सरचे लवकरात लवकर निदान झाल्यास त्यावर मात करणे शक्य आहे, या अपोलोच्या विश्वासावर ही मोहीम आधारित आहे. कॅन्सर तपासणी (स्क्रीनिंग), प्रतिबंधासाठी उपाययोजना आणि वेळेत उपचार यांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी या उपक्रमात नामवंत तज्ञ डॉक्टर, कॅन्सरवर मात केलेले नागरिक आणि आरोग्य क्षेत्रातील मान्यवर एकत्र आले आहेत. अपोलो हॉस्पिटल्स पुणे येथील 'ऑन्कोलॉजी सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विविध शाखांचे तज्ञ उपलब्ध आहेत, त्यांच्या समन्वयाने याठिकाणी कॅन्सरवर सर्वसमावेशक उपचार केले जातात. हे केंद्र अचूक आणि लवकर निदानासाठी एआय-सक्षम PET-CT, अचूक रेडिएशन थेरपीसाठी VARIAN EDGE LINAC, आणि मूत्रपिंड, स्त्रीरोग, जठरांत्र (Gastrointestinal), तसेच मान व डोक्याच्या कॅन्सरवरील जटिल शस्त्रक्रियांसाठी Da Vinci Xi रोबोटिक प्रणाली यांसारख्या आधुनिक उपकरणांनी सुसज्ज आहे. प्रगत निदान चाचण्या, अचूक रेडिएशन आणि रोबोटिक शस्त्रक्रियेच्या जोरावर हे केंद्र कॅन्सरचे लवकर निदान, अचूक उपचार आणि जलद रिकव्हरी यासाठी आवश्यक त्या सर्व घटकांचा समन्वय साधून तयार केलेला दृष्टिकोन अवलंबते. तंत्रज्ञान-आधारित आणि रुग्ण-केंद्रित सेवेद्वारे कॅन्सरवरील उपचारांचे परिणाम सुधारण्यासाठी अपोलो हॉस्पिटल्सची वचनबद्धता यातून पुन्हा एकदा अधोरेखित होते.

### पर्नोड रिकार्ड इंडियाकडून महाराष्ट्रात सीग्राम्स एक्सक्लेमेशनचा शुभारंभ




**मुंबई (दै. संध्या)**

**■ भारताचे पहिले मल्टी-कॅटेगरी ब्रँडेड हाऊस; एकाच प्रभावी ब्रँडखाली पाच स्पिरिट्स प्रकार**

पर्नोड रिकार्ड इंडिया ने महाराष्ट्रात सीग्राम्स एक्सक्लेमेशन! या नव्या ब्रँडचा शुभारंभ जाहीर केला आहे. गेल्या 30 वर्षांतील कंपनीची ही सर्वात महत्त्वाकांक्षी आणि नाविन्यपूर्ण घोषणा मानली जात आहे. सिग्राम्स एक्सक्लेमेशन! हा भारतातील एकमेव असा ब्रँड पोर्टफोलिओ आहे, ज्यामध्ये एकाच ब्रँडअंतर्गत पाच वेगवेगळ्या स्पिरिट्स प्रकारांचा समावेश आहे, व्हिस्की, व्होडका, जिन, रम आणि ब्रँडी. हे सर्व प्रकार प्रीमियम ॲडमिक्स सेगमेंटमध्ये समान किंमत श्रेणीत उपलब्ध असतील. हा ब्रँड एंट्री-लेव्हल प्रीमियम किंमत श्रेणीतील मोठ्या संधीच्या पार्श्वभूमीवर धोरणात्मक पद्धतीने सादर करण्यात आला असून, भारतातील वेगाने वाढणाऱ्या तरुण प्रौढ ग्राहकवर्गाला लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. या ब्रँडचा लक्ष्यित ग्राहकवर्ग 26 ते 30 वर्षे वयोगटातील आहे. हे ग्राहक सहजपणे आपली वेगळी ओळख निर्माण करणारे असून, वेगळेपणाकडे आकर्षित होतात. ते आपल्या मित्रपरिवारासोबत गटांमध्ये जोडलेले असतात आणि जेव्हा मिश्र गटांमध्ये एकत्र येतात, तेव्हा प्रत्येकाची पेयाची आवड वेगवेगळी असते. त्यामुळे व्हिस्कीबरोबरच जिन, व्होडका, रम आणि ब्रँडी यांसारख्या इतर श्रेणींची मागणीही वाढत असल्याचे दिसून येते. दरवर्षी 20 दशलक्षांहून अधिक ग्राहक कायदेशीर मद्यपान वयोगटात प्रवेश करत असताना, एक्सक्लेमेशन! सहज परवडणाऱ्या प्रीमियम किंमत श्रेणीत दर्जेदार स्पिरिट्सची अपूर्ण राहिलेली बाजारपेठेतील गरज पूर्ण करण्याचे काम करते. "इट्स टाइम फॉर एक्सक्लेमेशन!" या ब्रँडच्या संकल्पनेद्वारे, भारतातील नव्या पिढीच्या ग्राहकांसाठी साध्या क्षणांना असामान्य अनुभवांमध्ये रूपांतरित करणारा प्रेरक घटक म्हणून या ब्रँडची मांडणी करण्यात आली आहे.

पर्नोड रिकार्ड इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जीन टुबूल म्हणतात, "गेल्या तीन दशकांहून अधिक काळापासून पर्नोड रिकार्ड इंडिया देशातील प्रीमियम स्पिरिट्स उद्योगाच्या घडणीत अग्रस्थानी राहिले आहे.

एक्सक्लेमेशन! हा ब्रँड ग्राहकांच्या सखोल समजुतीतून तयार करण्यात आला असून, मिश्र गटातील सामाजिक प्रसंगांसाठी प्रीमियम दर्जा आणि विविधतेची अपेक्षा ठेवणाऱ्या भारतातील नव्या पिढीच्या ग्राहकांसाठी डिझाइन करण्यात आला आहे.

# पीसीसीओईआर आयोजित राष्ट्रीय रोबोराष्ट्र २०२६ स्पर्धेत एक लाख नव्वद हजार रुपयांची पारितोषिके वाटप

**पिंपरी, पुणे (दै. संध्या)**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) आयोजित संगणक अभियांत्रिकी विभागाच्या रोबोहॉक क्लबच्या सहकार्याने राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक महोत्सव स्पर्धा "रोबोराष्ट्र २०२६" चे आयोजन करण्यात आले होते. मित्सुबिशी इलेक्ट्रिक इंडियाचे सहाय्यक उपाध्यक्ष सुनील मेहता यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले.

या स्पर्धेत भारतातील अभियांत्रिकी महाविद्यालये आणि शाळांमधून १२० पेक्षा अधिक संघ आणि ४०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. वरिष्ठ श्रेणी, कनिष्ठ श्रेणी, रेस्क्यूलिंपिक्स ३.० आणि चक्रव्यूह या चार विभागांमध्ये तांत्रिक स्पर्धा घेण्यात आल्या. चारही विभागातील प्रथम तीन विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते एकूण १,९०,००० रुपयाची पारितोषिके आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. रोबोराष्ट्र २०२६ या राष्ट्रीय स्पर्धेला मित्सुबिशी इलेक्ट्रिक इंडिया यांनी शीर्षक प्रायोजक, व्हेंटेक ऑटोमेशन अँड रोबोटिक्स प्रा. लि. प्लॅटिनम प्रायोजक, बँक ऑफ महाराष्ट्रने गोल्ड प्रायोजक, अनस्टॉपन प्लॅटफॉर्म पार्टनर म्हणून सहभाग घेतला.

उद्‌घाटन प्रसंगी पीसीसीओईआरचे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, पीसीइटी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डीन डॉ. शितलकुमार रवंदळे, संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. विजय कोतकर, मित्सुबिशी इलेक्ट्रिक इंडिया येथील सहाय्यक उपाध्यक्ष सुनील मेहता, वेंटेक ऑटोमेशन अँड रोबोटिक्स प्रा. लि. चे सागर कोंढरे व योगेश एकशिंगे तसेच बँक ऑफ महाराष्ट्रचे साबीर अली शेख व रविंद्र सोनजे, समन्वयक डॉ. महेंद्र साळुंखे, प्रा. पल्लवी कुलकर्णी व प्रा. वृषाली देवर आदी उपस्थित होते. संस्थेचे सर्व डीन आणि विभाग प्रमुख यांनीही ह्या कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले.

या स्पर्धेत वरिष्ठ श्रेणी मध्ये प्रथम क्रमांक :- मुंबई येथील श्री विले पार्ले केळवणी मंडळाचे द्वारकादास जे. संघवी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथील टीम सोल्डर अँड फॉरगेट; द्वितीय क्रमांक :- ग्वाल्हेर येथील माधव इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्सची टीम पीआयएल डायनॅमिक्स आणि तृतीय क्रमांक :-पुणे, आकुर्डी येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची टीम ड्रेइक यांनी मिळवला.

कनिष्ठ श्रेणी मध्ये प्रथम क्रमांक :- पुणे येथील केंद्रीय विद्यालय क्रमांक १ मधील टीम कोड स्टॉर्म्स; द्वितीय क्रमांक :- नोव्हेल इंटरनॅशनल स्कूल मधील टीम एव्हीएसएस आणि तृतीय क्रमांक :- पुणे येथील संस्कृती स्कूलच्या टेकफोर्स टीमने मिळवला. रेस्क्युलॅम्पिक्स या विभागातील स्पर्धेत प्रथम क्रमांक :- कोयम्बतूर येथील केपीआर इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या टीम उविरा झेड पटकावला; तर द्वितीय क्रमांक :- आकुर्डी, पुणे डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय ची टीम टेक ओव्हर आणि तृतीय क्रमांक :- लोणावळा, पुणे येथील सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी टीम आयआयसी एसआयटी यांना मिळाला.

चक्रव्यूह विभागात प्रथम क्रमांक :- जेएसपीएमच्या राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग; द्वितीय क्रमांक :- लोणावळा, पुणे येथील सिंहगड सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी टीम इम्पोस्टर आणि तृतीय क्रमांक :- न्यू पुणे पब्लिक स्कूलच्या टीम बर्म्युडा ब्लास्टर यांनी प्राप्त केला.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि पीसीसीओईआर चे प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी विजेत्या संघाचे आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

## मांस आणि माशांच्या खुल्या विक्रीवर बंदी!

**मुंबई (दै. संध्या)**

**■ आता परवानगी असेल तरच दुकान चालणार; राज्य सरकारची मोठी घोषणा**

बिहारमध्ये मांस आणि माशांच्या खुल्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री आणि नगरविकास आणि गृहनिर्माण मंत्री विजय कुमार सिन्हा यांनी कडक इशारा दिला आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, मांस आणि माशांची दुकाने परवान्याशिवाय चालणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत स्वच्छतेच्या मानकांकडे दुर्लक्ष करणे खपवून घेतले जाणार नाही. बिहारींच्या आरोग्याशी तडजोड करणे खपवून घेतले जाणार नाही. संबंधित विभागाने प्राण्यांच्या आरोग्य तपासणीची देखील खात्री करावी. विजय सिन्हा म्हणाले की, शहरी भागात स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य आणि कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे आमचे प्राधान्य आहे. धार्मिक स्थळे, शैक्षणिक संस्था आणि संवेदनशील सार्वजनिक ठिकाणांजवळ नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुकानांवर विशेष कारवाई केली जाईल. शैक्षणिक संस्थांजवळ मांस आणि माशांची खुली विक्री संवेदनशील मनांवर विपरीत परिणाम करते. धार्मिक स्थळांवर खुली विक्री धार्मिक भावना दुखावते. त्यांनी सर्व महानगरपालिका संस्थांच्या अधिकाऱ्यांनी व्यापक तपासणी करावी आणि बेकायदेशीर दुकाने तात्काळ बंद करावीत असे निर्देश दिले. त्यांनी या कारवाईचा दररोज अहवाल विभागाला द्यावा. नगरविकास आणि गृहनिर्माण विभागाने राज्यातील सर्व महानगरपालिका संस्थांना बेकायदेशीरपणे चालणाऱ्या मांस आणि मासळीच्या दुकानांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

## लोकमंगल प्रथम कृषी राज्यस्तरीय पुरस्काराचे थाटात वितरण

**मुंबई (दै. संध्या)**



शेतकऱ्यांना आधार देण्याकरिता आणि त्यांच्या सन्मानासाठी प्रत्येक संस्था आणि राजकीय नेत्यांनी पुढे येण्याची गरज आहे. राज्यामध्ये समृद्ध शेतकऱ्यांचा एक समूह तयार केला, तर राज्य आणि देश प्रगतीपथावर मार्गक्रमण करेल. तरुणांनी शेती व्यवसायामध्ये चांगल्या पद्धतीने काम करून शेतीचे उत्पादन वाढवणे गरजेचे आहे तसेच पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांनी एक दिवस सोलापूर येथे येऊन आमच्या परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची देखील त्यांनी विनंती केली. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत लोकमंगल समूहाचे अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केले. लोकमंगल समूह आयोजित ,लोकमंगल कृषी व कृषी संलग्नित महाविद्यालय पूरस्कृत लोकमंगल कृषी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा प्रसंगी आमदार देशमुख हे बोलत होते. पद्मश्री पुरस्कार प्राप्त डॉ. श्रीरंग लाड परभणी (ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ) व सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विलास शिंदे (नाशिक )हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीराम ग्रामीण संशोधन विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष रोहन देशमुख यांनी केले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या लोकमंगल कृषी पुरस्काराचे महत्त्व आणि नियोजन सांगितले यंदाचे हे प्रथम वर्ष असून, ज्या शेतकऱ्यापासून या कार्यक्रमाची सुरुवात झाली त्या सर्व शेतकऱ्यांना मनापासून शुभेच्छा देत त्यांनी उपस्थित सर्व शेतकऱ्यांचे अभिनंदन केले आणि ही पुरस्काराची परंपरा यापुढेही कायम राहणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी बोलताना पद्मश्री श्रीरंग लाड म्हणाले की, शेतकऱ्याने पारंपरिक पद्धतीने पिकाची लागवड न करता आधुनिक पद्धतीने लागवड करून सतत देखभाल करणे गरजेचे आहे. कपाशीची लागवड केल्यानंतर त्या झाडाला किती फांद्या आहेत.? किती बोंड लागलेत.? त्याचे वजन किती? .त्यातून मिळणारा कापूस किती.? या सगळ्या गोष्टीचा अभ्यास करून जमिनीकडच्या बाजूला येणाऱ्या फांद्या कट केल्या तर झाडाच्या वरील इतर फांद्याच्या बोंडाचे वजन वाढते, पर्यायी उत्पादनामध्ये वाढ होते. एकरी पाच ते सहा क्विंटल कापूस निर्माण करणाऱ्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये १२ ते १८ क्विंटल पर्यंत उत्पादन मिळू शकते. अशा छोट्या, छोट्या गोष्टीची दक्षता घेऊन शेतकऱ्यांनी उत्पादन वाढविणे गरजेचे असल्याचे मतही लाड यांनी व्यक्त केले. यावळी नाशिकचे सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड चे डॉ. विलास शिंदे, कृषी विज्ञान केंद्र नंदुरबार येथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉक्टर राजेंद्र दहातोंडे, ज्येष्ठ पत्रकार कृष्णकांत चव्हाण आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. सचिन फुगे यांनी केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अजित कुरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष रोहन देशमुख, संस्थेच्या सचिवा डॉ. अनिता ढोबळे, प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, प्राचार्य सागर महाजन प्राचार्य डॉ. राणी मेत्रे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गायकवाड, प्राचार्य डॉ. बाळासाहेब बिराजदार, अजित राठोड, सचिन परमशेट्टी, सलमान शेख, प्रथमेश बाळपुरी, संकेत बिराजदार व सर्व महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# विकासाचा निर्धार; २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य

**मुंबई (दै. संध्या)**



राज्य विधानमंडळाच्या २०२६ च्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभी राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातून राज्य सरकारच्या विविध विकासात्मक उपक्रमांचा आढावा घेतला. "विकसित महाराष्ट्र - २०४७" या दूरदृष्टी आराखड्याअंतर्गत राज्याची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

राज्याने २०२४-२५ या वर्षात १,६४,८७५ कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करून देशात प्रथम क्रमांक मिळवला असून, ही एकूण एफडीआयपैकी ३९ टक्के आहे. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत सुमारे ३० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यातून सुमारे ४० लाख रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

"महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५" अंतर्गत ७० लाख ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ५० लाख रोजगारांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच स्टार्टअप धोरणाद्वारे पुढील पाच वर्षांत १,२५,००० उद्योजक घडविण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १,१०० कि.मी. लांबीच्या १४७ रस्ते प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून, समृद्धी महामार्गाचा विस्तार वाढवण बंदर व पूर्व विदर्भापर्यंत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. "महा-इन्व्हिट" उपक्रमाद्वारे पायाभूत प्रकल्पांसाठी खासगी गुंतवणुकीस चालना दिली जाणार आहे.

शेती क्षेत्रासाठी विविध महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आले. ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीज पुरवठा, ६.६३ लाख सौर पंपांची स्थापना, किमान आधारभूत किंमतीत कापूस व सोयाबीन खरेदी, तसेच नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना १५,५७६ कोटी रुपयांची मदत थेट खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी "उमेद" अभियानांतर्गत ६.६० लाख स्वयं-सहायता गट स्थापन करण्यात आले असून, २६ लाखांहून अधिक महिला 'लखपती दीदी' बनल्या आहेत. आदिवासी महिलांसाठी "राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजना" सुरू करण्यात येणार आहे.

आरोग्य क्षेत्रात अवयव प्रत्यारोपणासाठी ९ प्रकारच्या शस्त्रक्रिया मोफत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सर्वसमावेशक कर्करोग उपचार सेवा धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

शिक्षण क्षेत्रात सीईटी परीक्षा वर्षातून दोनदा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी "विद्यार्थी सुरक्षा, संरक्षण व मानसिक कल्याण धोरण-२०२५" लागू करण्यात आले आहे. तंत्रशिक्षणातील १५४ विषयांचे शैक्षणिक साहित्य मराठीत उपलब्ध करून देण्यात आले आहे.

पर्यटन व सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी अष्टविनायक, तुळजाभवानी, त्र्यंबकेश्वर आदी तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ३६६१ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याचा अभिमान व्यक्त करण्यात आला.

राज्य सरकार सर्वसमावेशक, प्रगत आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे राज्यपालांनी अधोरेखित केले. आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात विविध विधेयके व अर्थसंकल्पीय प्रस्ताव मांडण्यात येणार असून, राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सदस्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.



## शिरूर शहराकडे देशभरातून भाविकांचा शिव महापुराण कथेसाठी वळतोय लोंढा

**शिरूर (दै. संध्या)**

प्रभू श्री रामलिंगाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या शिरूर नगरीत सध्या 'हर हर महादेव'चा जयघोष दुमदुमत आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथावाचक पं. आचार्य प्रदीपजी मिश्रा यांच्या अमृतवाणीमधून रंगणाऱ्या भव्य श्री शिव महापुराण कथेच्या श्रवणासाठी राज्यासह देशभरातून भाविकांचे लोंढे शिरूरकडे वळत आहेत.

दि. २४ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत दररोज दुपारी १ ते ४ या वेळेत हा दिव्य अध्यात्मिक सोहळा पार पडत आहे. तब्बल ३० एकरांहून अधिक जागेवर उभारण्यात आलेल्या सुसज्ज आणि भव्य मंडपात लाखो भाविक एकाच वेळी बसून कथा श्रवण करू शकतील अशी उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण परिसरात भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्मिक ऊर्जा यांचा संगम अनुभवायला मिळत आहे.

लाखो भाविकांच्या उपस्थितीची दखल घेत विविध मूलभूत सुविधा सज्ज करण्यात आल्या असून आरोग्य सेवेवर विशेष भर देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर समस्त सकल मराठा समाज संघ, घोडनदी यांच्या वतीने सात दिवसांसाठी २४ तास रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ही रुग्णवाहिका कथा सोहळ्यादरम्यान सतत कार्यरत राहणार असून आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ वैद्यकीय मदत मिळणार आहे. कोरोनाच्या काळात परिसरातील नागरिकांच्या सेवेसाठी आणण्यात आलेली ही रुग्णवाहिका आज पुन्हा एकदा समाजसेवेच्या कार्यात पुढे सरसावली आहे, ही विशेष बाब मानली जात आहे.

सोहळ्याचे प्रमुख संयोजक प्रसिद्ध उद्योगपती व प्रसिद्ध उद्योगपती व माजी नगराध्यक्ष प्रकाश धारिवाल यांच्याकडे ही रुग्णवाहिका सुपूर्त करण्यात आली. यावेळी समाजाचे विश्वस्त प्रा. सतीश धुमाळ, संजय बारवकर , रमेश दसगुडे, योगेश महाजन, नगरसेवक सागर नरवडे, अनिल घावटे, गणेश खोले, नगरसेवक अभिजित पाचर्णे, शिरूर शिक्षण प्रसारक मंडळ चे अध्यक्ष धरमचंद फुलफगर, माजी नगरसेवक प्रवीण दसगुडे, किरण पठारे, माजी सरपंच अरुण घावटे, रुग्णवाहिकेची व्यवस्था पाहणारे डॉ. संतोष पोटे, व्यवसायिक सुनील धाडीवाल, आदित्य पतसंस्थेचे अध्यक्ष विनोद धाडीवाल, मातोश्री प्रतिष्ठानचे अभिजित आंबेकर, समस्त माहेश्वरी समाज शिरूरचे संदीप बिहाणी, अस्लम सय्यद, रवि आढाव, फिरोज शिकलकर, हलवाई चौक गणेश मित्र मंडळचे अध्यक्ष अशोक काळे, माजी सभापती संतोष शितोळे,आदी मान्यवर उपस्थित होते. उद्योगपती प्रकाश धारिवाल यांनी रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, "हा कार्यक्रम समस्त शिरूरकरांचा आहे. तो यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे," असे आवाहन केले.

### शिरूर पंचक्रोशी भक्तिमय वातावरणात

शिरूर पंचक्रोशीमध्ये हा भव्य दिव्य धार्मिक सोहळा संपन्न होत असून लाखो भाविकांच्या स्वागतासाठी शिरूरकर सज्ज झाले आहेत. भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून पाहायला मिळत आहे. अवघे शिरूर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमत असून, श्रद्धा आणि सेवाभावाचा हा महोत्सव प्रेरणादायी ठरत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### शिवजयंती उत्सव उत्साहात; रक्तदान, मर्दानी खेळ व सत्कार समारंभाने रंगत



कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : पूर्व हवेली तालुक्यातील बिवरी येथे 'एकता प्रतिष्ठान'च्या वतीने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. गुरुवार (दि. १९) ते शुक्रवार (दि. २० फेब्रुवारी २०२६) दरम्यान झालेल्या या दोन दिवसीय उत्सवाला ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळाला. उत्सवाच्या निमित्ताने ज्योत आणण्यास प्रस्थान, श्रींची महाआरती, रक्तदान शिबिर, डीजे लाईट शो, मर्दानी खेळ, भजन कार्यक्रम, भोजन समारंभ, 'महाराष्ट्राची लोकधारा' हा सांस्कृतिक कार्यक्रम तसेच नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा भव्य सत्कार समारंभ असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. शिवजयंती उत्सव कमिटी बिवरी, एकता प्रतिष्ठान बिवरी आणि समस्त ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम पार पडला. यावेळी जिल्हा परिषद सदस्या सुरेखा हरगुडे, प्रफुल्ल शिवले, सागर शेलार, दिपाली गव्हाणे, कोमल आव्हाळे तसेच पंचायत समिती सदस्य कुशाल सातव, सुदर्शन चौधरी, कृषिराज चौधरी, युवराज काकडे आणि मोनिका कंद यांचा मान्यवरांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन उत्सव कमिटीचे अध्यक्ष सौरभ शिवाजी गोते, उपाध्यक्ष गौरव राजेंद्र वाघले, खजिनदार रोहित गोरक्ष गोते यांच्यासह युवराज गोरक्ष गोते, संग्राम काळुराम गोते, ओंकार विजय वाघले, गणेश रोहिदास गोते आदींनी केले. यावेळी महालक्ष्मी डेव्हलपर्सचे दत्तात्रय गोते पाटील, विलास गोते, दशरथ गोते, अखिल भारतीय मराठा महासंघाचे युवक जिल्हाध्यक्ष दिपक गोते, पोलीस पाटील सागर गोते यांच्यासह गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती समितीचे पदाधिकारी, महिला, युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्सवामुळे बिवरी गावात शिवभक्तीचा आणि सांस्कृतिक एकात्मतेचा उत्साह पाहायला मिळाला.

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वतत्त्वांवर झील इन्स्टिट्यूटचा प्रेरणादायी उपक्रम

कान्हाटी (दैनिक संध्या) : कान्हाटी येथील मानव संसाधन व्यवस्थापन विषयांतर्गत झील इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन अँड रिसर्च (ZIBACAR), पुणे येथील विद्यार्थ्यांनी "छत्रपती शिवाजी महाराज, व्यवस्थापन आणि तत्त्वे" या विषयावर आधारित उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले. हा उपक्रम डॉ. सारिका घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वगुणांवर आधारित या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी नेतृत्व, नियोजन, प्रेरणा, संघटन कौशल्य आणि योग्य मनुष्यबळ व्यवस्थापन या तत्त्वांची उदाहरणांसह प्रभावी मांडणी केली. आजच्या युवा पिढीने आपल्या आयुष्यात प्रभावी व्यवस्थापन कसे आत्मसात करावे, याबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. झीबा कार (ZIBACAR)च्या विद्यार्थ्यांनी अभिनव स्कूल व श्री. वामनराव स्कूलसह विविध विद्यालयांना भेट देत हा उपक्रम राबवला.

# 'समृद्ध पंचायतराज' अभियानात लोकप्रतिनिधींनी सहभागी व्हावे

### पुरंदरच्या गटविकास अधिकाऱ्यांचे आवाहन




**सासवड (दै. संध्या)**

स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी ३१ मार्चपर्यंत 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबवले जात आहे. या अभियानात नव्याने निवडून आलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पुरंदरच्या गटविकास अधिकारी प्रणोती श्रीश्रीमाळ यांनी केले.

सोमवारी (ता. २३) सासवड शहर पत्रकार संघाच्या वतीने आयोजित नवनियुक्त सदस्यांच्या सत्कार समारंभात त्या बोलत होत्या.यावेळी जिल्हा परिषद सदस्य प्राजक्ता दुर्गाडे, रुपाली झेंडे, हरिभाऊ लोळे, अजय इंगळे तसेच पंचायत समिती सदस्य अमित झेंडे, माणिक निंबाळकर, अर्चना कटके, माऊली यादव, सायली शिंदे, स्मिता निगडे व मोनिका कांबळे यांचा पत्रकार संघाच्या वतीने शाल, गुलाबपुष्प व संत सोपानदेव यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना सर्व सदस्यांनी, "पक्ष व गटतट बाजूला ठेवून पुरंदरच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र काम करू," अशी भावना व्यक्त केली.

याप्रसंगी ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष रोहित अभंग यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास शशांक सावंत, संतोष निगडे, डॉ. मनोज शिंदे यांच्यासह पत्रकार संघाचे सदस्य गणेश मुळीक, जीवन कड, बाळासाहेब कुलकर्णी, राजेंद्र बर्गे, जगदीश शिंदे, संदीप जगताप आणि सुनील वढणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संभाजी महामुनी यांनी केले, पत्रकार संघाचे अध्यक्ष हेमंत ताकवले यांनी सूत्रसंचालन केले तर आभार सुधीर गुरव यांनी मानले.

# विविध भाषा असूनही भारत एकसंध - प्रा. यास्मिन शेख

**पुणे (दै. संध्या)**

भारत हा वैविध्यपूर्ण देश आहे, विविध परंपरा, उपासना, खानपान, अनेक भाषा असे असूनही भारत एकसंध आहे. भाषेला धर्म नसतो आणि सीमा देखील नसतात, असे परखड मत ज्येष्ठ भाषा आणि व्याकरण तज्ञ प्रा. यास्मिन शेख यांनी लिखित संदेशातून आज येथे मांडले. आठव्या राष्ट्रभक्ती साहित्य संमेलनात त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले, त्यावेळी त्यांच्या वतीने त्यांची कन्या रुमा बावीकर यांनी पुरस्कार स्वीकारला.



कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आठव्या राष्ट्रभक्ती साहित्य संमेलनामध्ये प्रा. यास्मिन शेख यांना शिक्षणप्रेमी शांतारामशेठ शहासने जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले, त्यावेळी त्यांच्या संदेशाचे वाचन करण्यात आले. त्यात त्या पुढे म्हणतात की, मी मराठी भाषेची सेविका आहे. सर्व भाषांच्या व्याकरणाची माहिती घेतली तरच उत्तम अनुवाद करता येतो. अनुवाद हे एकमेव असे माध्यम आहे जे कोणताही वाद निर्माण करत नाही.

यावेळी महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचे कार्यवाह डॉ. अविनाश चाफेकर यांना कवयित्री उर्मिलाताई कराड जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळीवज्येष्ठ पुरातत्व संशोधक डॉ. गो. बं. देगलूरकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटीचे अध्यक्ष किरण ठाकूर, संमेलनाच्या अध्यक्षा ज्येष्ठ अनुवादक डॉ. शुचिता फडके, स्वागताध्यक्ष ज्येष्ठ अनुवादक डॉ. रवींद्र गुर्जर, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे विवेक भोसले, मराठीकाका अनिल गोरे, ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रकांत शहासने, संयोजिका तेजाली शहासने उपस्थित होते.

यावेळी बोलतांना ठाकूर म्हणाले की, सर्व धर्म, जाती, संप्रदाय यांना विविध भाषांनी जोडून ठेवले आहे. देशाचा स्वातंत्र्यासाठी सर्वच धर्मीयांचे योगदान आहे. त्याहीने विविध भाषांचा उपयोग आपल्या देश बलवान होण्यासाठी करायला हवा. देशातील सर्व नागरिकांनी भारतीयत्वाची भावना जपायला हवी. "अनुवादातून राष्ट्रभक्ती" या संकल्पनेला वाहिलेल्या या दोन दिवसीय साहित्य संमेलनात जीवनगौरव पुरस्कारांबरोबरच स्वातंत्र्यसेनानी व त्यांचे वारस, सेनादलातील सैनिक आदींचे सत्कार करण्यात आले.

ओळख देशभक्तांची हा उपक्रम सुमारे तीन वर्षे चालला, ज्यात महाराष्ट्रातील विविध शाळांमधून राष्ट्रभक्त क्रांतिकारकांची सचित्र माहितीचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या उपक्रमाच्या समाप्तीची घोषणा यावेळी करण्यात आली. उपस्थितीतांचे स्वागत मंजिरी शहासने, ॲड. नंदिनी शहासने, भालचंद्र कुलकर्णी यांनी केले.

## पंढरीनाथ लांडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**चाकण (दै. संध्या)**

चाकण येथील श्री साईबाबा पतसंस्थेचे चेअरमन व जुन्या पिढीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पंढरीनाथ श्रीपती लांडे यांच्या ९१ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त चाकण येथे बुधवारी (दि.२५) सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती उद्योजक अरुण लांडे व रमेश लांडे यांनी दिली.



सामाजिक क्षेत्रात आघाडीवर असणारे पंढरीनाथ लांडे यांचे लोकोपयोगी काम कौतुकास्पद आहे. त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा, हा हेतू डोळ्यासमोर ठेवून लांडे कुटुंबीयांच्या वतीने चाकण येथे बुधवारी येथील मीरा मंगल कार्यालयात सकाळी ११ वाजता त्यांचा सहस्रचंद्रदर्शन व अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यानिमित्त सकाळी सात वाजता बिरदवडी येथील ग्रामदैवत रोकडोबा महाराजांचा अभिषेक, आठ वाजता येथील गोशाळेत चारा वाटप व त्यानंतर नऊ वाजता अनाथ मुलांना खाऊ वाटप करण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता समाज प्रबोधनकार हभप. ज्योती गरुड यांचे प्रवचन होणार आहे. दुपारी साडेबारा वाजता ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान व अभिष्टचिंतन सोहळा रंगणार आहे.



## आई-वडिलांचे आशीर्वाद हेच मुलांच्या प्रगतीचे खरे बळ

**आळंदी (दै. संध्या)**

आई-वडिलांचे आशीर्वाद हेच मुलांच्या उज्वल भविष्यासाठी खरे प्रेरणास्थान आहे. मुलांची सर्वांगीण प्रगती ही त्यांच्या संस्कारांवर अवलंबून असते. त्यामुळे पालकांनी मुलांशी संवाद साधत त्यांना वेळ देणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन नगरसेविका ऋतुजा घुंडरे यांनी केले. श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यामंदिर व श्री ज्ञानेश्वर बालक मंदिर प्रशालेत मातृ–पितृ पूजनाचा संस्कारक्षम सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा ह.भ.प. भाग्यश्री भाग्यवंत होत्या. यावेळी नगरसेविका ऋतुजा घुंडरे, नगरसेवक सुरेश झोंबाडे, माजी विद्यार्थी व रोबोटिक्स अभियंता नितीश साळुंखे व परिवार, संस्थेचे सचिव अजित वडगावकर उपस्थित होते. मुख्याध्यापक प्रदीप काळे यांनी प्रास्ताविकात शालेय शिक्षणाबरोबरच संस्कारक्षम उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थिनी ईश्वरी ढगे हिने मातृ–पितृ पूजन हा कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असल्याचे सांगितले. नगरसेविका ऋतुजा घुंडरे म्हणाल्या, आई-वडिलांचे आशीर्वाद हेच मुलांच्या आयुष्याचा आधारस्तंभ असतात.

पालकांनी मुलांशी विविध विषयांवर चर्चा करावी, त्यांना धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना घेऊन जावे आणि एकत्र वेळ घालवावा. संस्कार आणि संवाद यामुळेच मुलांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण होते.

## सत्तेत असूनही सेवेत अग्रेसर : मोदी विचारातून प्रेरित दिलीप ठाकूर

**नांदेड (दै. संध्या)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सेवा, समर्पण आणि अंत्योदय या मूलमंत्रातून प्रेरणा घेत माणुसकी प्रत्यक्ष कृतीत उतरवणारा 'मायेची ऊब' हा उपक्रम आठव्या वर्षीही जोमाने राबवण्यात आला. मोदींच्या 'सबका साथ,सबका विकास' या विचारांची साक्ष देत धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ४० रात्री मध्यरात्री शहरातील रस्त्यांवर फिरून,थंडीने कुडकुडत पडलेल्या बेघरांच्या अंगावर २०२६ ब्लँकेट पांघरून देण्यात आली. त्यानंतर महापालिकेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांना ब्लँकेट वाटप करून या सेवाभावी उपक्रमाची सांगता करण्यात आली."जितके वर्ष तितके ब्लँकेट" हे सूत्र जपत मायेची ऊब हा उपक्रम भाजपा नांदेड महानगर अमरनाथ यात्री संघ,लायन्स क्लब नांदेड सेंट्रल आणि सन्मित्र फाउंडेशन यांच्या वतीने दरवर्षी राबवला जातो.या सामाजिक उपक्रमास मा.मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण,खा.डॉ.अजित गोपछडे,भाजपा प्रदेश संघटन मंत्री संजय कोडगे,भाजपा अध्यक्ष अमरनाथ राजुरकर,डॉ.संतुकराव हंबर्डे,ॲड.किशोर देशमुख,लायन्स उप प्रांतपाल योगेश जायस्वाल, लायन्स सेंट्रल अध्यक्ष डॉ.अमोल हिंगमिरे,सन्मित्र फॉउंडेशन चे डॉ.दि. बा.जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.



या वर्षी ब्लँकेट देणाऱ्या दात्यांमध्ये संजय लाहोटी,ॲड.दिलीप ठाकूर, रूपेश वट्टमवार,सन्मित्र फाउंडेशन सीतारामजी जाजु,लीलादेवी सितारामजी जाजू,स्नेहल संजय जाजू,प्रमोद हिबारे,ला.योगेश जायस्वाल,अशोक पडगीलवार,डॉ. तेजस्विनी पांडुरंग जोशी,स्नेहलता जायस्वाल,दिलीपराव धर्माधिकारी, शशिकांत देशपांडे (बाऱ्हाळी),सौ. अंकीता रुपेश मुत्तेपवार,डॉ.राजेंद्र मुंदडा,ऋचा मुंदडा (बेंगलोर),मोहित व रेणुका सोनी,प्रा.प्रभाकर उदगीरे, डी.एच.अग्रवाल,रेणुकाई निवास, अज्ञात दाता,अविनाश चिंतावार (डोंबिवली),अबिरा गौरी राहुल पवार, साईनाथ पदमवार,संजय खुपसे, कैलाश झंवर (परभणी),सौ.गयाबाई शेषराव कदम,सोनाली वारले, शिवराज मनजित विंचूरकर,केदार आनंद इनामदार,सुरेश पळशीकर, अज्ञात दाता,विश्वेश्वर नांदेडकर, तिरूपती पाटील कल्याण (नायगाव), सुधाकर रामराव जबडे (देगलूर),प्रा. डॉ.एस.एस.झंपलवाड (मुखेड), हरिसिंह चव्हाण (कोंडलवाडी),डॉ. भगवान केंद्रे (गंगाखेड),सतीश सुगनचंदजी शर्मा,सौ.अलका मिलिंद पेकमवार,प्राचार्य सुधीर शिवणीकर, अशोक गंजेवार,चि. अन्वय अक्षय गोधमगांवकर,चि. जय आल्हाद गोधमगांवकर,लक्ष्मी टेंकाळे,डॉ. अनिता पुदरोड,सिद्राम सूर्यभान दाडगे,रागिणी जोशी,कमलबाई सारडा,कंचन खटोड (इचलकरंजी), अभिलाषा मालपाणी (बेंगलोर) यांचा समावेश असून या उपक्रमासाठी सुरेश लोट,अरुण काबरा,सुरेश शर्मा, कामाजी सरोदे,संतोष भारती,सुरेश निलावार,जयश्री ठाकूर,सविता काबरा,संगिता यादव,भोला धुमाळ, रोहन यादव,शिवा लोट,राजेशसिंह ठाकूर,जनार्धन वाकोडीकर,अंकित शर्मा,शिवचरण लोट यांनी दररोज रात्री १२ च्या सुमारास शहरातील विविध भागांत जाऊन प्रत्यक्ष ब्लँकेट वाटप केले.यामध्ये रेल्वे स्टेशन,बस स्थानक,शंकरराव चव्हाण रुग्णालय (विष्णुपुरी),श्री.गुरुगोविंदसिंघजी स्मारक रुग्णालय,महिला रुग्णालय (श्यामनगर),लहुजी साळवे अनाथा श्रम आणि संध्या छाया वृद्धाश्रम येथे ब्लँकेट वितरित करण्यात आले. या शिवाय महापालिकेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांनाही ब्लँकेट देण्यात आले.

दरम्यान मायेची ऊब उपक्रमाच्या ९ व्या वर्षाची सुरुवात नोव्हेंबर महिन्यात मोदी ग्राउंड नांदेड येथे होणाऱ्या प्रदीपजी मिश्रा (सिहोरवाले) यांच्या शिव महापुराण कथेदरम्यान होणार असल्याची माहिती संयोजक धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांनी दिली.

# महिलांसाठी खास 'होम मिनिस्टर'; ५ पैठणी जिंकण्याची सुवर्णसंधी

**नांदेड (दै. संध्या)**

दि. २१ व २२ फेब्रुवारी रोजी कुबेरनगरी मौजे लोंढेसांगवी प्रस्तुत नरेंद्र–देवेंद्र महोत्सव आयोजित करण्यात आला असून यावर्षी या महोत्सवात पहिल्यांदाच महिलांसाठी 'होम मिनिस्टर' हा खास कार्यक्रम ठेवण्यात आला आहे.या कार्यक्रमांतर्गत विविध मनोरंजक खेळांमधून विजेत्या पाच महिलांना 'लालपोतू कलेक्शन'तर्फे पैठणी साडी तर उपविजेत्या २० महिलांना ऑरगंज्या साडी देण्यात येणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष शिवप्रसाद राठी व संयोजक धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांनी दिली.

शनिवार दि.२१ फेब्रुवारी रोजी पहिल्या दिवशी १४ वा मराठी हास्य दरबार भरविण्यात येणार असून या हास्य दरबारात स्टँडअप कॉमेडीचे बादशहा बंडा जोशी,झी हास्य सम्राट सिद्धार्थ खिल्लारे तसेच लोकप्रिय शाहीर रमेश गिरी हे आपल्या विनोदी सादरीकरणातून रसिकांचे भरभरून मनोरंजन करणार आहेत. याच दिवशी रमेश पारसेवार,ॲड.गजानन पिंपरखेडे,रत्नाकर वाघमारे व गंगाप्रसाद तोष्णीवाल यांना नांदेड भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे तर सुधाकर पत्रभूषण पुरस्कार प्राप्त मान्यवरांमध्ये पन्नालाल शर्मा,अभय कुळकजाईकर,चारुदत्त चौधरी, संतोष पांडागळे व रामेश्वर काकडे यांचा समावेश आहे. रविवार दि.२२ फेब्रुवारी रोजी महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी २४ वे अखिल भारतीय विराट कविसंमेलन आयोजित करण्यात आले असून या कविसंमेलनात मेरठ (उत्तर प्रदेश) येथील हास्य संचालक व क्रांती कवी सौरभ जैन सुमन, जबलपूर (मध्य प्रदेश) येथील हास्य गीतकार सुदीप भोला,भिलवाडा (राजस्थान) येथील हास्य व्यंग्य कवी दीपक पारेख,मैनपुरी (उत्तर प्रदेश) येथील वीर रस कवी डॉ.मनोज चौहान,सुरत (गुजरात) येथील श्रृंगार रसाच्या कवयित्री सोनल जैन तसेच दिल्लीच्या वीर रस कवयित्री नेहा शर्मा 'नमन' यांचा सहभाग असणार आहे.याच कार्यक्रमात मा.मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांना नांदेड भूषण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.नांदेडमध्ये पहिल्यांदाच भव्य स्वरूपात होणाऱ्या या 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाला महिलांनी व मुलींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्यास दरवर्षी नरेंद्र–देवेंद्र महोत्सवात हा कार्यक्रम नियमितपणे समाविष्ट केला जाईल अशी माहिती भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शिवप्रसाद राठी व भाजपा जिल्हा सरचिटणीस ॲड. दिलीप ठाकूर यांनी दिली आहे.

नरेंद्र–देवेंद्र महोत्सवाच्या पहिल्या दिवशी मराठी हास्यदरबार कै. चंद्रभागा केरबाजी गंजेवार नगरी, नवा मोंढा मैदान,नांदेड येथे रंगणार असून यामध्ये चला हवा येऊ द्या फेम मिमिक्री किंग सतीश कासेवार यांचा बहुचर्चित 'होम मिनिस्टर' कार्यक्रम होणार आहे. सर्वसाधारणपणे या कार्यक्रमात एकच पैठणी पारितोषिक दिले जाते;मात्र नांदेडमध्ये पहिल्यांदाच ५ पैठणी व २० ऑरगंज्या साड्या पारितोषिक स्वरूपात देण्यात येणार आहेत.'होम मिनिस्टर' कार्यक्रमात महिलांशी संवाद साधत विविध मनोरंजक खेळ घेतले जातात यामध्ये महिलांची कल्पकता,कौशल्य आणि आत्मविश्वास यांना या मंचावर व्यासपीठ मिळते.उखाणे,विनोदी संवाद आणि हास्याचे क्षण उपस्थितांचे भरपूर मनोरंजन करतात.तळ्यात–मळ्यात सारख्या खेळांमधून महिलांची चपळता तपासली जाते तर संगीतावर आधारित गाणे ओळखा हा खेळ सर्वांच्या विशेष पसंतीस उतरतो. विनोदी उखाणे सादर करणाऱ्या सौभाग्यवतींना विशेष पारितोषिकेही दिली जाणार आहेत.या कार्यक्रमामुळे महिलांच्या आयुष्यात उत्सवाचा आनंद अधिकच द्विगुणित होतो. या शिवाय महोत्सवात वेळेवर उपस्थित राहणाऱ्या दहा रसिकांना भाजपा कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष सुरेश लोट यांच्यातर्फे १० कलर टीव्ही भेट दिले जाणार आहेत. त्यामुळे महिलांनाही कलर टीव्ही जिंकण्याची संधी मिळणार आहे. या महोत्सवात देशातील नामवंत हास्यकवी व हास्यकलाकार सादरीकरण करणार असल्याने तब्बल ५ तासांचा हा कार्यक्रम कसा संपतो हे रसिकांना कळतही नाही.